# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. २५/०२/२००९

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक २५/०२/२००९ रोजी सभा सुचना क्र. २३ दि. १८/०२/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात दुपारी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रिक्स | -- | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | -- | सदस्य |
| ३) | श्री. मिलन वसंत म्हात्रे | -- | सदस्य |
| ४) | सौ. शानु गोहिल | -- | सदस्या |
| ५) | सौ. सुनिता कैलास पाटील | -- | सदस्या |
| ६) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | -- | सदस्य |
| ७) | श्री. टेरी पॉल परेरा | -- | सदस्य |
| ८) | श्रीम. ग्रिटा स्टिफन फॅरो | -- | सदस्या |
| ९) | श्रीम. हेलन गोविंद | -- | सदस्य |
| १०) | श्री. याकुब कुरेशी | -- | सदस्य |
| ११) | श्री. अनिल दिवाकर सावंत | -- | सदस्य |
| १२) | श्री. जुबेर इनामदार | -- | सदस्य |
| १३) | श्री. मदन उदितनारायण सिंह | -- | सदस्य |
| १४) | श्री. श्रीप्रकाश जिलेदार सिंह | -- | सदस्य |
| १५) | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | -- | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. प्रकाश पांडुरंग ठाकूर | -- | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. दादासाहेब आ. पाटील | -- | मुख्य लेखापरिक्षक |
| २) | श्री. शिवाजी बारकुंड | -- | शहर अभियंता, सार्व बांधकाम |
| ३) | श्री. उत्तरेश्वर लोंढे | -- | सहा. संचालक नगररचना |
| ४) | श्री. श्रीकांत मोरे | -- | मुख्य लेखाधिकारी |
| ५) | श्री. दिपक खांबित | -- | कार्यकारी अभियंता, सार्व. बाधकाम विभाग |
| ६) | श्री. नरेंद्र चव्हाण | -- | जनसंपर्क अधिकारी |
| ७) | श्री. गोविंद परब | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| ८) | श्री. सुनिल यादव | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ |
| ९) | श्री. संजय दोंदे | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. २ |
| १०) | श्री. क्लासो फर्नांडीस | -- | मुख्य अग्निशमन अधिकारी |
| ११) | श्री. स्वप्नील सावंत | -- | विभाग प्रमुख, जाहिरात विभाग |
| १२) | श्री. नरेंद्र पाटील | -- | विभाग प्रमुख, भांडार |
| १३) | श्री. संदिप शिंदे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १४) | श्री. राजकुमार कांबळे | -- | मुख्य स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग |
| १५) | डॉ. लहाने | -- | आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग |
| १६) | श्री. दादासाहेब खेत्रे | -- | विभाग प्रमुख, जकात |
| १७) | श्री. एन के. सोनार | -- | प्रशासन अधिकारी, शिक्षण |
| १८) | श्रीम. सिमा मिश्रा | -- | सिस्टिम मॅनेजर, संगणक विभाग |
| १९) | सौ. सई वडके | -- | विधी अधिकारी |
| २०) | कु. चारुशिला खरपडे | -- | अधिक्षक, आस्थापना विभाग |
| २१) | श्री. किरण राठोड | -- | विभाग प्रमुख, अतिक्रमण विभाग |

**गैरहजर अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. बालाजी खतगावकर | -- | उपायुक्त (मु.) |

| | | | |
|---|---|---|---|
| २) | श्री. संभाजी पानपट्टे | -- | उपायुक्त, आरोग्य विभाग |
| ३) | श्री. ओमप्रकाश दिवटे | -- | उपायुक्त अतिक्रमण |
| ४) | श्री. अजित पाटील | -- | कर निर्धारक व संकलक |
| ५) | श्री. विजय पाटील | -- | सहा. आयुक्त, परिवहन विभाग |
| ६) | श्री. गणेश पाटील | -- | प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ४ |
| ७) | श्री. भारत जगताप | -- | सहा. नगररचनाकार |
| ८) | श्री. शरद बेलवटे | -- | उप मुख्य लेखाधिकारी |
| ९) | श्री. मनोहर म्हात्रे | -- | विभाग प्रमुख, वाहन |
| १०) | श्री. संजय तायशेटे | -- | विभाग प्रमुख, परवाना |
| ११) | श्री. संजय गोखले | -- | सहा. आयुक्त, सामान्य प्रशासन |
| १२) | श्री हेमंत पाटील | -- | चौकशी अधिकारी |
| १३) | श्री. बाबुराव वाघ | -- | विभाग प्रमुख, वाहन |
| १४) | श्री. रामचंद्र असोदेकर | -- | विभाग प्रमुख, सुवर्ण जयंती |
| १५) | श्री. हंसराज मेश्राम | -- | विभाग प्रमुख, वन विभाग |

**मा.सभापती :-**

स्थायी समिती आणि सर्व सदस्यां तर्फे आलेल्या नविन कमिशनर साहेबांचे स्वागत करतो. आपल्या पहिल्या मिटिंगला ते उपस्थित राहिलेले आहे. तसेच सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

(नगरसचिव यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.)

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब इतिवृत्तांत का नाही येत ?

**नगरसचिव :-**

एकदम १० इतिवृत्तांत द्यायचे आहेत म्हणून थांबवले.

**जुबेर इनामदार :-**

पण, आम्हाला कसे आठवेल ?

**नगरसचिव :-**

एकदम १० इतिवृत्तांत संपूर्ण देतो ना.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब, एकदम १०-१० कसे आठवण राहतील. आपण नक्की काय केले होते की, प्रत्येक मिटिंगचे इतिवृत्तांत पुढच्या सभेच्या आधी आमच्याकडे पोहचायला पाहिजे.

**नगरसचिव :-**

१० इतिवृत्तांत एकदम द्यायचे होते म्हणून थांबवले.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, आपल्या परिवहन समितीच्या निवडणूकीला स्थगिती आलेली आहे.

**नगरसचिव :-**

स्थगिती कुठे आले ?

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे परवा मा. महासभेत काय ठरले ?

**नगरसचिव :-**

स्थगिती कुठे आलेली आहे. पोस्ट पोन झालेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे पोस्ट पोन झाले. पण, मंत्रालयातुन काय पत्र आले ते आहे का ?

**नगरसचिव :-**

मंत्रालयातुन काहीही पत्र आलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा.आयुक्त साहेबांना पत्र आले का ?

**नगरसचिव :-**

नाही.

**मिलन म्हात्रे :-**

असे कसे. तुम्हीच निर्णय घेतला का ?

**नगरसचिव :-**

सभागृहाचा निर्णय आहे. मा.आयुक्त साहेबांनी काहीच निर्णय घेतलेला नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सभागृहामध्ये मंत्रालयाचा उल्लेख झाला. असे काय करताय.

**नगरसचिव :-**

तिथुन मार्गदर्शन मागितले. मार्गदर्शन प्राप्त झाले नाही. असा उल्लेख आहे. मार्गदर्शन जे मागितले ते आले नाही असा उल्लेख झाला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग आता ही मेंडेट्री कमिटी आपल्याला नेमायची आहे. त्या इलेक्शनच्या बद्दल परिवहन आणि विशेष खात्याचे ठराव त्या संबंधात काही पत्रव्यवहार तुमच्याकडे आलेला आहे का ?

**नगरसचिव :-**

काहीच पत्र आलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

नक्की.

**नगरसचिव :-**

माझ्याकडे तरी काहीच आलेले नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, तुम्ही इतिवृत्तांत देणार की नाही. कारण, ह्याच्यानंतर आपली मिटींग लागणार नाही. दोन महिने, तर आता तुम्ही देवून टाका. दोन महिने आमचा अभ्यास तरी होईल. आम्ही काय बोललो. काय नाही.

**नगरसचिव :-**

उद्या किंवा परवा १० इतिवृत्तांत पाठवून देतो. प्रकरण क्र. १३३, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कायमस्वरुपी अधिकारी / कर्मचारी यांचे मेडीक्लेम योजनेबाबत.

**मिलन म्हात्रे :-**

यांचा अधिकारी कोण आहे? माझ्या माहितीनुसार न्यू इंडिया इन्श्योरन्स को.ऑपरेटिव्ह यांनी तुमच्याकडे दर वगैरे दिले होते. ते साईड ट्रॅक झाले. त्याचा खुलासा करा.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, प्रथम स्थायी समिती सदस्यां तर्फे आपले नविन आयुक्त शिवमुर्ती नाईक यांचे सर्व सदस्यांतर्फे आम्ही स्वागत करतो. मा.सभापती साहेब, हा विषय घ्यायच्या अगोदर सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांनी विचारलेल्या प्रश्नाचे तुम्ही उत्तर द्या. एक चुकीची प्रथा आपल्याकडे पडले की, आयुक्तांच्या मान्यतेने बरेचसे ठराव बी.पी.एम.सी. ॲक्ट ७३ (५) खाली पास होतात. अपेक्षा ही असते की, स्थायी समितीमध्ये त्याच्यावर चर्चा व्हावी. ह्याच्यापुर्वी जवळ-जवळ ६ की ७ करोड रुपयाचे ठराव पास झालेले आहे. त्याची स्थायी समितीमध्ये कुठचीही चर्चा होत नाही. अपेक्षा ही आहे की, ह्याच्यापुढे तरी निदान आयुक्तांचे जे ठराव असतील किंवा अवलोकन असो. आपण मान्यता देवू. मान्यता द्यायलाच पाहिजे. कारण इमरजन्सी मध्ये तो खर्च असतो. ॲटलिस्ट स्थायी समिती मध्ये त्याच्यावर चर्चा तरी व्हावी. मागच्या वेळेला सदस्य मदन सिंग यांनी सुचना केली होती. आयुक्तांच्या मान्यतेने ४० कामे आली होती त्या मिटींगमध्ये त्यातली किती कामे झालेली आहेत आणि किती कामे व्हायची आहेत. ह्याचे सुध्दा व्यवस्थित विश्लेषण आहे. ते सुध्दा प्रशासनातर्फे करण्यात यावे.

**मा.आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, आयुक्तांनी जे प्रकरण मंजूर करतात. ते आपल्याकडे मंजुरीसाठी येत नाही. आपल्याकडे अवलोकनात येते. अवलोकनात आलेली कामे ही झाले की नाही आणि व्यवस्थित झाले की नाही हे तुम्ही बघू शकता.

**मिलन म्हात्रे :-**

सुरुवात इकडून आहे की, आयुक्तांनी अवलोकन किती रकमेचे करायचे ? त्याचा लिमिट आहेत. फक्त आपतकालिन परिस्थिती मध्येच आयुक्तांनी ते केले पाहिजे. आम्ही जेव्हा ट्रेनिंगला जातो ना. तुमच्यासारखे आय.ए.एस. ऑफीसर रिटायर झाल्यानंतर सांगतात की, आयुक्तांनी काय केले नाही पाहिजे. असतात तिथपर्यंत सगळं करतात. तुम्ही तुमच्या लिमिटेशन सांगा ना. आता १०-१० लाख, १-१, २-२ करोड रुपयाची कामे अवलोकनाला येतील. तर मग बाकीच्या सभागृहाची गरजच नाही. आयुक्तांनीच बसून केले पाहिजे. हे तर सत्य आहे की, ती रक्कम तुम्ही आपतकालिन परिस्थितीमध्ये खर्च करायची आहेत.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब, आपले नगरसेवक किती आहे. इतके नगरसेवक येतात. आपल्याला एक-एक काम सुचवतात. आणि काम नाही केलं तरी

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही विषयाला बदल देवू नका. काम करु नये असे मी म्हणत नाही. आर.डी.शिंदे साहेबांपासुन जर तुम्ही आयुक्तांचा अवलोकनाच हे काढतात तर सगळ्यात जास्त हॅट्रीक

आर.डी.शिंदे नी केले. उठसुठ अवलोकन मग सभागृह ठेवले कशाला ? आणि अवलोकन पण चुकीची केली ना. नंतर तुमच्या सारखे सभापती बोलतात त्यावेळेला मोहन पाटील बोलायचे. नाही ते अवलोकन आहे. ते आपल्याला बघायचे नाही. आयुक्तांनी अवलोकन केल्यानंतर तुमच्याकडची एकदा मंजूरी मिळाली की, उद्या काही प्रॉब्लेम झाला तर आयुक्त बोलतो चुकलो ठिक आहे. स्टँडींग ने मान्यता दिले ना.

**मा. आयुक्त :-**

मान्यता दिली नाही. अवलोकन केले.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, त्याच्यात आमचा ५ टक्के पार्ट आला ना. ९५ टक्के तुमचा पार्ट.

**जुबेर इनामदार :-**

मा.सभापती साहेब, अवलोकन होवू द्या. काम झाली पाहिजे. गरजेची कामे आयुक्त अवलोकन मध्ये आणतात. मात्र काही सदस्यांना त्या विषयावर चर्चा करायची असते तर त्याला अनुमती द्या ना. मा.सभापती साहेब, प्रथा अशी राहिलेली आहे की, सभापती साहेब, सर्व अवलोकन आलेले मंजूर. विषय संपला मिटिंग आटपते. असे करु नका. चर्चा होवू द्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुमच्या माहितीकरीता सांगतो जे रस्ते, फुटपाथ आणि गटर जे अस्तित्वात नाही त्याचे अवलोकन झाले. हे बरोबर आहे का ?

**जुबेर इनामदार :-**

अवलोकनमध्ये जे विषय येतील त्या विषयावर चर्चा होवू द्या ना. सदस्यांना चर्चा करायची आहे तर चर्चा होवू द्या. प्रत्येक विषयावर चर्चा करत नाही. ठराविक विषयावर सदस्यांना चर्चा करायची आहे तर चर्चा होवू द्या ना.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, मला वाटते सर्वात जास्त ट्रेनिंग म्हात्रे साहेबांनी सगळ्यांकडे घेतलेली आहे. तर त्या ट्रेनिंग प्रमाणे जे बोलले. अकस्मित खर्च. अकस्कित असले तरच १० लाख रु. च्या आतमधली कामे करायची. अकस्मित शब्द या ॲक्ट मध्ये नाही.

(नगरसचिवांनी ॲक्टचे वाचन सभागृहात केले)

**मा. आयुक्त :-**

अकस्मित शब्द आहे का ?

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही ह्याच्यातुन वाचून दाखवले ना. त्याचा मुद्दयातुन मी बोललो. कारण, १५ दिवसांच्या आत तुम्हाला कळवायचे आहे. इकडे तीन-तीन, चार-चार महिन्याची अवलोकन येतात.

**मा. आयुक्त :-**

हा कळवायची.

**मिलन म्हात्रे :-**

असु द्या ना. पण १५ दिवसाचा लिमिट तुम्हाला आहे.

**मा. आयुक्त :-**

आम्ही कळवल्या नंतर तुम्ही मिटिंग लावता त्यावेळेला येणार ना.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्हाला चार महिन्याचे कळवणे गरजेचे आहे का ?

**मा. आयुक्त :-**

१५ दिवसाच्या आत आम्ही कळवणार.

**मिलन म्हात्रे :-**

पण, १५ दिवसाची लिमिट आहे ना. आमचे ऑब्जेक्शन तेच आहे. तीन-तीन, चार-चार महिन्याची अवलोकन येतात.

**मा. आयुक्त :-**

१५ दिवसात कळवू.

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे कलम वाचले. त्यानुसार मी बोलतो.

**मा. आयुक्त :-**

अकस्मित खर्च असेल तरच आयुक्तांनी करावे असे म्हटलं होतं म्हणून त्यावर मी ऑब्जेक्शन घेतले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

पण, त्या १० लाख रुपयाची लिमिट किती? करोडोची, दोन करोड, अडीच करोड, साडे तीन करोड एवढी लिमिट.

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे टोटल काउंसलर कुठे आहे. आयुक्त स्वतःची मनमानी करत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मी बोलतच नाही. हा विषय त्याचा नाही. आम्ही कुठे बोलतो कामे करायची नाही. कामे करा ना. तुम्ही रेग्युलर कामे काढतच नाही. सगळी अवलोकनामध्ये तुम्ही घेवून येतात. आमचा तो आक्षेप आहे. आणि दुसरा आक्षेप असा आहे की, जी कामे नाही झाली ती अवलोकनाच्या लिस्ट मध्ये काम आहेत.

**मा. आयुक्त :-**

आपल्याकडे जे एकूण काउंसलर आहे. १० लाख रुपयाचे काम करण्यासाठी आयुक्त इथले नसतात. म्हणजे स्थायीक नसतात. हे काम व्हायला पाहिजे ते काम व्हायला पाहिजे असे आयुक्तांनी करावे आणि सभेपुढे पाठवावे अशी इच्छा नसते. परंतु, आपले काही काउंसलर १० लाख रुपयाच्या आतमध्ये माझे काम आहे. करा म्हटल्यानंतरच करतात. माझे म्हणणे असे नाही की, त्यात सभासदाने बघू नये. १० लाख रुपयाच्या आत केलेली कामे तुम्ही तपासू शकता. तुम्ही बघू शकता. प्रत्यक्ष एस्टीमेट प्रमाणे काम झाले की नाही. काम क्वालिटीप्रमाणे झाले की नाही हे तुम्ही तपासू शकता. या गावातल्या लोकांनी तुम्हाला निवडून दिलेले आहे. तुम्ही लोक प्रतिनिधी आहे. तुम्हाला तो हक्क आहे. आम्ही जरी अवलोकन पाठवले तरी तुम्ही तपासू शकता. मात्र किती कोटीचे पाठवणार, किती लाखाचे पाठवणार ह्याच्याशी हे निगडीत नाही. कारण, आयुक्त स्वतःच्या मनाने काम काढत नाही. काही काउंसलर घेवून येतात. आणि ते मंजूर होतात. आम्ही स्वतःच्या मनाने कुठलंच काम मंजूर करत नाही. या उपर ठाण्यामध्ये किंवा इतर महापालिकेत जर तुम्ही तपासणी केली. दहा लाख रुपयाची आतली कामे. तर एका-एका मिटिंगला ५-५ कोटी रुपयाची कामे असतात. तुम्ही तपासून घ्या. कामे बघून घ्या. काम झाले की नाही ते बघा. क्वालिटी झाले की नाही ते बघा. एस्टीमेट पेक्षा जास्त झाले की कमी झाले ते ही तुम्ही तपासून घ्या. तुम्हाला बघण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. मात्र तुम्ही इतकच काय केले. तितकच काय केले. कारण आयुक्त स्वतःच्या मनानी काही करत नाही. सभासद येतात त्या वेळेला मंजूर होतं.

**अनिल सावंत :-**

साहेब, मान्य आहे. पण तसे नाही. तो तुमचा अधिकार आहे. तुम्ही त्याच्या अंतर्गत काम करा. पण, ॲटलीस्ट आमची ही अपेक्षा असते की, स्थायी समितीमध्ये त्याच्यावर ही चर्चा व्हावी.

**मा. आयुक्त :-**

चर्चा करु नका असे मी कुठे म्हणतो.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्हाला एक छोटंसं उदाहरण देतो. आपल्या मिरा भाईदर महानगरपालिकेमध्ये फ्लाय ओव्हरच्या खाली रेशनिंग साठी जागा दिली. त्यांना केबिन बांधून दिली. त्या दिवशी रेशनिंग ऑफीसमध्ये आमचे काम होतं म्हणून आम्ही गेलो होतो. त्यावेळी तिथे कॉम्प्युटर होता. आणि त्याच्यावर लिहिले होते की, मा. महापौरां तर्फे आम्हाला कॉम्प्युटर देण्यात आलेला आहे. आणि आम्ही तिथे पाहिलं होते त्यांना विचारले, तेव्हा ते बोलले की, मा. महापौर साहेबांनी कॉम्प्युटर दिलेला आहे. महापौर हा महानगरपालिका नाही. आणि आज तुमच्या अवलोकनामध्ये कॉम्प्युटर साठी पन्नास हजार रु. शिधावाटप कार्यालय तिथे खर्च दाखवतो. १४५ नं. म्हणजे नगरसेवक निधी असेल तर नगरसेवक निधीतुन असा उल्लेख केला पाहिजे. नगरसेवक निधी असेल तर मा. महापौर यांच्या जवळून घेवू शकतात का? नाही घेवू शकत. आता हा कोणाचा नगरसेवक निधी आहे? मा. महापौर साहेबांचा आहे का ?

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांचा निधी नाही. मा. महापौर साहेबांनी तिकडे जे फर्निचर वगैरे केले ना.

**अनिल सावंत :-**

कॉम्प्युटर वर लिहिले होते. खुर्चीवर लिहिले की नाही मला माहित नाही. पण आपला ठराव असा झाला की, फक्त केबिन बनवून द्यावी.

**दिपक खंबित :-**

केबिनच बनवून दिलेली आहे.

**अनिल सावंत :-**

मी सुध्दा हेच म्हणतो. डिस्कशन व्हायला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

एक सभासद निधी आहे. वर्षा भानुशाली चे.

**अनिल सावंत :-**

साहेब मग ह्याच्यामध्ये उल्लेख व्हायला पाहिजे.

**दिपक खंबित :-**

साहेब ते चुकून राहून गेले.

**मदन उदितनारायण सिंह :-**

मा. सभापती साहेब, शिधावाटप कार्यालय मध्ये आपण नगरसेवक निधी देवू शकता का? तसे जी.आर. मध्ये आहे का ?

**अनिल सावंत :-**

सरकारी कार्यालयामध्ये नगरसेवक निधीतून आपण एखादी गोष्ट देवू शकतो का? मग आम्ही पण देतो ना?

**मा. आयुक्त :-**

नगरसेवक निधी हे सभासदांच्या स्वखुशीचा प्रश्न आहे. ते काहीही देवू शकतात.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, त्याचा जी.आर. आहे. कुठे द्यायचा आणि कुठे नाही द्यायचा.

**मा. आयुक्त :-**

जी.आर. बघू ना.

**मिलन म्हात्रे :-**

पण बघितला नाही ना. प्रश्न तो आहे. मनू भाईच्या मॅक्सेस मॉलचे दिले आहे. गृह खात्याची परवानगी असेल तर, पण दिला नाही ना. जी.आर. बघितला नाही.

**शानु गोहिल :-**

आप अभी जी.आर. देख रहे है। पहले जी.आर. देखने की जरुरत नहीं पडी थी क्या ?

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, त्या पोलिस चौकीला गृह खात्याची परवानगी नाही. हे तत्कालीन आयुक्तांनी बघायला पाहिजे होते. आमच्या सारख्याला कळते. आणि आय.ए.एस. ऑफीसरला कळत नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब आता विषयावर या.

**मिलन म्हात्रे :-**

विषय तोच आहे. त्याच्या खाली परत मातीचा भराव आला. लाल मातीचा पुरवठा करणे. कलेक्टर ऑफीसला जावून इनक्वायरी केली. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या गेल्या ८ वर्षापासून एक ही रॉयल्टी फाटलेली नाही. आणि लाखो रुपयाचे मातीचे भराव झालेले आहे. रॉयल्टी तहसिलदाराकडून प्रत्येक वर्षी सगळ्या आयुक्तांना चिफ ऑफीसरांना ते लोक पत्र काढतात की, तुमच्याकडे वर्षाला मातीचे जे-जे भराव होतात. आम्हाला पत्र दिले हे रॉयल्टीचे पैसे आम्ही तुमच्याकडे घेवून तुम्हाला त्वरित मंजु-या देवून टाका. एक ही रॉयल्टीची पावती फाडलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

रॉयल्टी कॉन्ट्रॅक्टर ने भरावी. या अटीवर टेंडर द्या. आणि त्याची पावती आणल्यानंतर त्याचे बिल द्या.

**मिलन म्हात्रे :-**

कारण, मागे ४२ लाख रुपयाचा भराव झाला. एकही रॉयल्टी भरलेली नाही.

**शानु गोहिल :-**

जी.आर. क्या है? उसका जरा खुलासा करो ना।

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, हा जो मेडिक्लेमचा प्रस्ताव प्रशासनासाठी आपण आणलेला आहे. ते प्रशासनातील जे कर्मचारी, अधिकारी आहे. म्हणजे शिपाईपासून ते ऑफीसर पर्यंत सर्वांना ॲप्लीकेबल ही पॉलिसी करणार आहे का?

**मा. आयुक्त :-**

जे परमनन्ट आहे त्यांच्यासाठी.

**अनिल सावंत :-**

मग, त्याच्यासाठी त्यांची मान्यता आहे का? असे आहे की, त्यांची जर ऑलरेडी मेडीक्लेम पॉलिसी असेल आणि हे जर तुम्ही दुस-या कंपनीचे देत असाल तर त्यांना कुणाची तरी डबल ॲडवान्टेज त्याचे मिळणार नाही.

**मा. आयुक्त :-**

त्यांची मेडिकल पॉलिसी असू दे किंवा नसू दे. प्रत्यक्षात महापालिकेत कर्मचारी काम करायला लागला की, त्याला मेडिकल क्लेम द्यावा लागतो. एक-एक कर्मचारी वीस-वीस हजार रु., पंचवीस-पंचवीस हजार रु. रक्कम घेतात. म्हणजे आजारी पडले कुटुंबातली लोक तर खर्च जास्त येतो. त्यामुळे एकदा २६९० रु. भरले तर ते देण्याची जरुरी भासणार नाही. एका वर्षापर्यंत नाहीतर प्रत्येक महिन्याच्या पगारातुन त्यांना मेडिक्लेम द्यायला बरं पडेल.

**अनिल सावंत :-**

बरोबर आहे. मेडिकल कॉस्ट पण आता जास्त झाले आता आयुक्तांनी कुठचे प्रस्तावीत केले.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये युनायटेड इंडिया इश्योरन्स कंपनी, नॅशनल इश्योरन्स कंपनी ह्या सगळ्यांना डावळून बोनसाल पावर ऑफ सिस हा काय प्रकार आहे.

**मा. आयुक्त :-**

टोटल जे आहेत ते १२ कंपन्या आलेल्या आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, न्यु इंडियाचे पॅकेज आपल्याकडे आले होते. ते नाकारले. माझ्या माहितीनुसार सांगतो. माझ्याकडे त्यांचा नंबर आहे. व्हिक्टर परेरा म्हणून आहेत ते देवून गेले. सगळ्यात चांगली कंपनी आहे. कारण, मी माझा मेडिक्लेम त्यांच्याकडे काढलेला आहे. त्यांचे पॅकेज आपण स्विकारले नाही.

**मा. आयुक्त :-**

या मिटिंगला पेन्डींग ठेवा. मी त्यांना बोलवून घेवून चर्चा करतो. जर त्यांचा रेट कमी असेल तर त्यांना देवू.

**मिलन म्हात्रे :-**

कमीचा प्रश्न नाही. बेनिफिट्स काय मिळतील ते बघा. साहेब, आपल्या कर्मचाऱ्यांचा फायदा झाला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

मेडिक्लेम कॅशलेस असायला पाहिजे. मा. आयुक्त साहेब, त्याच्यामध्ये माझी अशी सुचना आहे की, त्यांना मेडिक्लेम कॅशलेस असायला पाहिजे. त्या संस्थेला त्या कंपनीला कॅशलेस द्यायची.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ते बरोबर आहे. मी दहा मेडिक्लेम काढले तो माझा व्यक्तीगत प्रश्न आहे. पण, महानगरपालिकेकडून आपण दिलेच पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

न्यु युनायटेड इंडिया इश्युरन्स कंपनी जी आहे. ते मेडिकल अलाउन्स काही आजारी पडले तर १ लाख रु. पर्यंतच खर्च देतात. आणि आपण आता जे मंजूरीसाठी ठेवले.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, पण मी न्यु इंडियाचे बोलतो साहेब आमचे म्हणणे काय आहे की, प्रशासकीय कामकाज आहे ते तुम्ही आचार संहितेत पण करु शकता. तुम्ही सर्व पॉलिसी एजन्सीला बोलवा.

**मा. आयुक्त :-**

मी इंडिया इन्श्युरन्स पन्नास हजार देतो. तीन नंबर बघा, तक्ता बघा, आलेले बारा कंपन्यांचे जे टेन्डर आहेत त्या टेन्डर मधला तक्ता बघा. मी इंडिया इन्श्युरन्स कंपनी, पहिल्या पानावर तीन नंबरला त्याचे पन्नास हजार देणार. फॅसिलीटी कमी आहे आणि रक्कम पण कमी आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब वरती बघा. न्यू इंडिया इन्श्युरन्स लिमिटेड कंपनी १ लाख रुपये आहे.

**मा. आयुक्त :-**

एक लाख आहे पण आपण मंजूरीसाठी २ लाख रुपये ठेवले आहे. बोन्साए पॉवर ऑफ द सिक्स कंपनी कुठली.

**मा. आयुक्त :-**

आता कुठली कंपनी आहे ती बघायला कसे जाणार

**सभापती :-**

आज एवढे अधिकारी लोक आहेत. महानगरपालिकेचा एवढा पैसा भरणार आहोत. कंपनी कुठली आहे आज उघडी आहे. उद्या चालू आहे का नाही ते बघायला पाहिजे.

**मा.आयुक्त :-**

आणि कुठले दवाखाने यादीमध्ये जोडलेले नाहीत दवाखान्याची नावे नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तो बोन्साए कंपनीच्या नावात बोन्साए आहे म्हणजे वाढ नाही होत.

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हाला दोन मिनिट समजावून सांगतो म्र तुम्हाला मंजूर करायचे असेल तर करा. नाहीतर नका करू. आपण एखाद्या जमिनीचा व्यवहार करायला लागतो. तर स्टॅप ड्यूटी वर ॲग्रीमेंट करताना २ टक्के घेणाऱ्याकडून आणि २ टक्के देणाऱ्याकडून असते. ऑन पेपर असतात तर त्या प्रमाणे ज्यांनी टेंडर भरलेले आहे. त्या त्या कंपनीचे एजेंट आहे. एजेंट यांना त्या कंपनीकडून मिळणारे जे कमिशन आहे. एकजन कमी कमिशनवर करतो. एकजन जास्त कमिशनवर करतो. त्यांनी स्वतःचे इनकम कमी करून त्यांनी कमी करून घेतले असेल. आणि सुरू राहील म्हणून त्यांनी जास्त केलं असेल.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब हा मुद्दा पटण्यासारखा नाही. भले कंपन्या तुमच्याकडे आल्यात.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही आता इन्शोरन्स कंपनी वाल्याकडे गेलात तर त्यांना ५ टक्के कमिशन मिळते मी काय चुकीचे सांगतो का ?

**मिलन म्हात्रे :-**

एजेंट ला.

**मा. आयुक्त :-**

हो एजेंटला

**मिलन म्हात्रे :-**

आपण आपल्याकडे डायरेक्ट कंपनी हवाल केले.

**मा. आयुक्त :-**

आता ते एजेंट ने भरले ना.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब नाही हे काय न्यू इंडिया इश्योरन्स कंपनीचे डायरेक्ट नाव आहे.

**मा. आयुक्त :-**

पण तो एजेंट आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब आमचे म्हणणे असे आहे की, हा एजेंट आहे. म्हणूनच आमचा विरोध आहे. तुम्ही डायरेक्ट कंपनीला कॉल कराना साहेब त्यांना बोलावून घ्याना.

**मा. आयुक्त :-**

उनको कंपनीने कन्सल्ट दिया है।

**शानु गोहिले :-**

लेकिन एजेंट थ्रू दिया है ना अगर आप डायरेक्टची कॉन्टेक्ट करते है.....

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही कंपनीला डायरेक्ट बोलवा ना.

**मा. आयुक्त :-**

मेडिसिन कंपनी के पास जायेंगे एक बिल लेकर जायेंगे तो वह लोग मेडिसिन नही देते डिलर के थ्रू देते है।

**मिलन म्हात्रे :-**

साहेब तसे नाही त्याला लायसेन्स असते त्याचा लायसेन्स कुठे आहे.

**अनिल सावंत :-**

गोविंद परब साहेब यांच्याकडे न्यू इंडिया इश्युरन्स चे कंपनीचे डेव्हलपमेंट अधिकारी स्वतः आले होते. तुम्ही त्यांना विचारांना.

**मा. आयुक्त :-**

या विषया संबधी मी चर्चा करून पुढच्या मिटिंगमध्ये विषय घेतो. डायरेक्ट कंपनीवाले घेतात का ते मी अगोदर विचारतो. सगळयाच कंपनीवाल्यांना बोलावून घेतो त्यांच्याशी चर्चा करतो आणि पुढच्या मिटींगला विषय घेतो.

(मा. आयुक्त सो., यांच्या आदेशाने सदरचा विषय पुढच्या मिटींगच्या घेण्याचे ठरले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३४, बंदरवाडी (खारी) स्मशानभूमी देखभाल व दुरुस्ती करीता मे. परहीत सेवा संघ यांना मुदतवाढ देण्यास मान्यता देणे.

**याकुब कुरेशी :-**

यांचे कामकाज कसे आहे ? आतापर्यंत आपण त्यांना चालवायला दिलेली. त्यांनी आपल्याला वर्षभरात किंवा दोन चार वर्षा मध्ये त्यांचा रिपोर्ट किंवा त्यांची तक्रार वैगेरे आली का?

**मदन उदितनारायण सिंह :-**

अपने मिरा भाईंदर में शान जैसी समशान है। कोई भी बाहर से लोग आते है। तो वह देखके मिरा भाईंदर का लोग नाम निकालते है की, मिरा भाईंदर मे ऐसी समशान है! इसके लिए यह विषय पास किया जाये? तो मे ठराव माडता हूँ. तीन साल के लिए !

**याकुब कुरेशी :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**मिलन म्हात्रे :-**

ठराव झाला पण मला सांगा नविन ठरावा नुसार त्या लाकडाचा हिशोब तिकडे काय लावला ? मा. आयुक्त साहेब, तुम्ही स्वतः भाईंदर वेस्टच्या स्मशानभूमीत ज्या बॉडी जळायला लाकडे राहिलेली नाही. वास्तव एवढं वाईट झालेलं आहे. भाईंदर मधल्या आमच्या गावातली संस्था ना नफा ना तोटा लॉस सहन करून गावकऱ्यांनी व्यापाऱ्यांनी काढलेली ती एक संस्था आहे. गेल्या अनेक वर्षापासून जवळ जवळ ४० वर्षापासून मी बघतो. सगळं चांगलं व्यवस्थित चाललय. एक ठराव पास झाला. त्या संस्थेनी लाकडे आणायचे बंद केलं. बरं संस्था ८०० रू. ला लाकडे देते. आणि ठराव १०० टक्के चा माझ्याघरी कोणाचा मृत्यू झाला तर मी काय तुमच्याकडे १०० रू. साठी भिक मागायला येणार. साहेब जावून गोडावून बघून घ्या. परिस्थीती वाईट आहे. हातातून बाहेर जाईल.

**मा. आयुक्त :-**

आता हा प्रश्न जो आहे तो मुदतवाढीचा आहे.

**मिलन म्हात्रे :-**

विषय आलेला आहे. पण प्रत्येक स्मशनाभूमीला तो त्रास आहे.

**मा. आयुक्त :-**

हा विषय आहे मुदतवाढीचा आणि आपली तक्रार लाकडाची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

स्मशनाशीच निगडीत आहे.

**मा. आयुक्त :-**

हो निगडीत आहे. ते लाकडाचे का ठेवत नाही. जर ठेवत नसतील तर मी स्वतः बघून समक्ष करेन.

**मिलन म्हात्रे :-**

पहिला तुम्ही जावून गोडावून बघून या. सगळ्यात जास्तीत जास्त बॉड्या जाणाऱ्या स्मशान भाईंदर वेस्ट चे आहे.

**मदन उदितनारायण सिंह :-**

प्रकरण क्र. १३४ खारी बंदरवाडी. यहा एक सूचना देता हूँ । बंदर और खारी करते है. तो इसमे खारीगांव कोस्टक मे बंदरवाडी किया जाऐ । क्योकी वह जो एरिया है ! अपने ७/१२ उतारा में खारी बोलते है ।

भाईंदर (पूर्व) खारीगाव (बंदरवाडी) स्मशानभूमी मे. परहित सेवा संघ या संस्थेने स्वखर्चाने विकसित केलेली असून सदर संस्थेमार्फत स्मशानभूमीची देखभाल व दुरूस्ती करण्यात येते. मा. स्थायी समिती सभा दि. १७/०३/२००६ ठराव क्र. २२८ अन्वये सदर देखभाल व दुरूस्ती कामाकरीता मे. परहित सेवा संघ यांना तीन वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदत हि दि. २८ मार्च २००९ रोजी संपत असून सदर संस्थेच्या कामाबाबत काहीही तक्रार नाहीत. तरी सदर संस्थेस पुढील तीन वर्षाच्या कालावधी करीता सदर स्मशानभूमीची देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता भाडयाने देण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

**शानु गोहिल :-**

सदर ठरावाला माझे अनूमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानूमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३४ :-**

बंदरवाडी (खारी) स्मशानभूमी देखभाल व दुरुस्ती करीता मे. परहीत सेवा संघ यांना मुदतवाढ देण्यास मान्यता देणे.

**ठराव क्र. १२२ :-**

भाईंदर (पूर्व) खारीगाव (बंदरवाडी) स्मशानभूमी मे. परहित सेवा संघ या संस्थेने स्वखर्चाने विकसित केलेली असून सदर संस्थेमार्फत स्मशानभूमीची देखभाल व दुरूस्ती करण्यात येते. मा. स्थायी समिती सभा दि. १७/०३/२००६ ठराव क्र. २२८ अन्वये सदर देखभाल व दुरूस्ती कामाकरीता मे. परहित सेवा संघ यांना तीन वर्षाकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर मुदत हि दि. २८ मार्च २००९ रोजी संपत असून सदर संस्थेच्या कामाबाबत काहीही तक्रार नाहीत. तरी सदर संस्थेस पुढील तीन वर्षाच्या कालावधी करीता सदर स्मशानभूमीची देखभाल व दुरुस्ती करण्याकरीता भाडयाने देण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३५, मिरा भाईंदर क्षेत्रातील द्वितीय ९ ग्रुप ठेका होर्डीग्ज (९० होर्डीग्ज) निवीदेस मंजुरी मिळणेबाबत.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, या विषयामध्ये या शहरामध्ये होर्डिंग्ज चे बरेचसे टेंडर ठिक निघाले तेव्हा बरच महापालिके मध्ये ठेका माफिया असे मी त्यांना बोलेन बरेच काय ते प्रयत्न करून उलाढाल करायचा प्रयत्न केला. १६०० रू. किमान दरामध्ये तेव्हा ही ठेके काढण्यात आले होते. मी राजीव जाधव साहेबांचे अभिनंदन करतो. त्यांनी त्या विषयाला पकडून धरले. त्यानंतर ४१०० मध्ये प्रत्येक होर्डिंग्ज या शहराची गेली. आता परत एक सेकंड लूक ९० होर्डिंग्ज चा काढण्यात आला. तेव्हा ही परत त्याच दराने किमान १६०० रू. दराने हे होर्डिंग्ज काढण्यात आले होते. याचा ठेका काढण्यात आला. निविदा काढण्यात आली. मी त्याच्यावर आक्षेप घेतला. आमच्या लोकांनी बरेच पत्र व्यवहार केले. मी ही केला. फेरनिविदा मागविण्याकरीता मी त्याचा वारंवार प्रयत्न केला. नंतर परत, राजीव जाधव साहेबांनी त्या ठेकेदारांना बोलावून घेतले. काहीतरी वाटाघाटी त्यांच्या वाचनामध्ये झाली. नंतर हा विषय ३०००/- रू. पर्यंत आला. साहेब जे होर्डिंग्ज आजच्या तारखेमध्ये ४०००/- रू. ने या शहरामध्ये गेले. ते कमी दराने का जावे ? आपल्या शहराच्या उत्पन्नाचा भाग आहे. वसूलीचा भाग आहे. ते ४१०० किंवा ह्याच्यापेक्षा जास्त कमी नाही. साहेब या आणलेल्या विषयाला माझा स्पष्ट विरोध आहे. आणि या विषयावर माझी आपल्याला सूचना आहे की, आपण फेरनिविदा मागवाव्या. आणि त्या ४१०० रू. च्या दराने होर्डिंग्ज दिले गेले तर ते किमान दर पकडावा त्याला गरज असली तर मा. महासभे मध्ये हा विषय परत आणावा. त्या विषयाला मान्यता द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

स्टॅडिंग ला आणला तरी चालेल पण वाढलेला दर कमी नाही झाला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

मा. महासभे मध्ये आणायची गरज नाही. एक फिक्स रेट करून टाका.

**जुबेर इनामदार :-**

साहेब अगोदर मा. महासभेचा ठराव झाला होता. म्हणून त्यांचे जाहिरात विभागाचे मत झाले होते की आम्ही करूच शकत नाही.

**अनिल सावंत :-**

मा. महासभेमध्ये २६०० चा ठराव कुठे झाला आहे.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील द्वितीय ९ ग्रुप ठेका होर्डिंग्ज करीता निविदास मंजुरी मिळणेबाबत विषय स्थाई समितीच्या मान्यतेसाठी आणला होता. तरी सदर ठेकेदारांचे भाव कमी असल्यास प्रती होर्डिंग्ज रु. ४००१/- पहिल्या वर्षी करीता किमान दराने फेर निविदा आणण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**मा. आयुक्त :-**

भांडार पाल ने दिलेले आहे १ ला ९२ हजार रू. म्हणजे पहिल्या वर्षाकरीता. तर टेंडर आले ३ लाख १२ हजार रू. दुसऱ्या वर्षाकरीता २ लाख ११ हजार रू. आपले इस्टीमेंटच कॉस्ट लिये आहे. ३ लाख ४३ हजार रू. तिसऱ्या वर्षाकरीता २ लाख ३२ हजार रू. आपले एस्टीमेंट आहे. तिथे आले ३ लाख ७७ हजार रू. आणि एकूण १० लाख ३२ हजार ७२० रू. चे टेंडर

**जुबेर इनामदार :-**

साहेब, मी तुम्हाला माहिती देवू इच्छितो. ह्याच्या आधि या शहरामध्ये जे होर्डिंग्ज गेलेले आहे. तर शहर काही बदललेले नाही. शहर तोच आहे. याच्या आधी या विषयावर चर्चा झाली. आणि ते रेट वाढलेले आहे. ४१०० रू. प्रति होर्डिंग्ज केले. म्हणजे आता हा वाढला.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, आपण जेव्हा ठाण्याला जातो तेव्हा चायना ब्रिज च्या राईट ला फार मोठा होर्डिंग्ज लागलेले आहे. ते आपल्या महानगरपालिकेचे आहे की, महानगरपालिकेला रॉयल्टी वैगेरे मिळते का ?

**स्वप्नील सावंत :-**

खाजगी आहे.

**अनिल सावंत :-**

खाजगी असेल तर महानगरपालिका कलेक्ट करते ना.

**स्वप्नील सावंत :-**

आपण त्यांच्याकडून वार्षिक पैसे घेतो.

**अनिल सावंत :-**

माहिती घ्या कारण फार मोठी होर्डिंग्ज आहे.

**मा. सभापती :-**

नविन टेंडर काढा.

**प्रकरण क्र. १३५ :-**

मिरा भाईंदर क्षेत्रातील द्वितीय ९ ग्रुप ठेका होर्डीग्ज (९० होर्डीग्ज) निवीदेस मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १२३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील द्वितीय ९ ग्रुप ठेका होर्डिंग्ज करीता निविदास मंजुरी मिळणेबाबत विषय स्थाई समितीच्या मान्यतेसाठी आणला होता. तरी सदर ठेकेदारांचे भाव कमी असल्यास प्रती होर्डिंग्ज रु. ४००१/- पहिल्या वर्षी करीता किमान दराने फेर निविदा आणण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार** **अनुमोदक :- श्री. याकुब कुरेशी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३६, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते दुरुस्ती करणे बाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये विभागावाढ दर निश्चित करून ठेकेदार नेमलास सर्व रस्ते दुरूस्त कामे सोयीस्कर वेळास पार पडे ती. या विभागा मार्फत वेळोवेळी अंदाज पत्रक द्यावे पण तुम्ही एकदाच टेंडर मागवणार आहे. ना वेळोवेळी अंदाज पत्रक का तयार करणार ?

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, हे आपण अटेम्प्ट रेट मंजूर करतो. ॲटेम्प्ट रेट मागवायचा ॲटेम्प्ट रेट मागवला नंतर ज्याची दुरूस्ती करायची आहे. त्याचे एस्टीमेंट सेप्रेट होणार ते तुमच्या पुढे येणार. आणि त्या दराप्रमाणे काम करायचे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब पण त्याच्यात डी.एस.आर. चा कुठेच उल्लेख केला नाही. या विषयाचा उल्लेख पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

साहेब टेंडर काढताना येणार ना डी.एस.आर. चा हा रेट आहे. आणि तुमचे टेंडर कोंड करा म्हणून.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, ह्या ठरावात जर डी.एस.आर. घातला नाही तर तिकडे येणारच नाही. सगळा मामला क्लिअर आहे. साहेब तुम्हाला सांगतो अनुभव निराळे आहेत. माझ्याकडे एक वर्ष झाले खड्डे बुजवलेले नाही. टेंडर निघाले वर्क ऑर्डर नाही. आता आपल्या सुभाषचंद्र बोस मैदानाच्या इथून टन मारतो. खड्डे पडले वर्ष झाले. तुम्हाला रिलायन्स पैसे देते. एम.टी.एन.एल. वाले देतात. खड्डे पडले की पैसे वसुल होतात. पण खड्डा वर्ष वर्ष बुजला जात नाही.

**मा. आयुक्त :-**

नविन टेंडर आलेले आहे. आता हे वर्ष भराचे टेंडर काढायचा आहे. आणि जे ना दुरूस्त झाले त्याचे एस्टिमेंट समिती पुढे येईल. मंजूर करून ॲग्रीमेंट करून ठेवल्या नंतर त्या एस्टिमेंट प्रमाणे काम करायचे ऑर्डर जे आयटम ज्यांचे कमी दराचे आहे त्यांना दिले जाईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, विषय असा आहे. तुम्ही आयटम रेट मागवला तो पूर्ण वर्षासाठी फिक्स आहे. मग तुम्ही अंदाज पत्रक कोणाला तयार करणार आता इथे काम म्हटले की एखाद्याने परमिशन मागीतली की फुटाचा रस्ता आपण खोदलेला आहे तर त्याचा एस्टिमेंट ऑलरेडी त्यांच्याकडे डिपार्टमेंटमध्येच आहे. मग १० फुटाचा एस्टिमेंट लगेच तयार करून एवढा रस्ता तयार करून दे. त्यासाठी वेगळे अंदाज पत्रक करायची गरज काय आहे.

**दिपक खांबित :-**

एस्टिमेंट चे काही नाही त्यांच्याकडे पैसे आले त्या कामाचा आपल्याला एस्टिमेंट करायला लागेल ना.

**मिलन म्हात्रे :-**

मला एक सांगा या ठरावानुसार आम्ही तुम्हाला कामाला मंजूरी दिले. तुम्ही वर्क ऑर्डर दिली वर्ष भराचे काम काढले नाही काढले. काम झाले, काम नाही झाले. मे च्या अगोदर मंजूर झालेली कामे गणपती येवून गेले तरी अजून कामे झाली नाही. हे वास्तव आहे. मी तुम्हाला दाखवतो खड्डे किती ठिकाणी आहेत ते.

**दिपक खांबित :-**

साहेब म्हणून तर आपण टेंडर बार बार काढायचे.

**मिलन म्हात्रे :-**

मला सांगा तुम्ही या गोषवाऱ्यात लाईन टाकल्यात रस्ते दुरूस्ती आणि कामावर हा विलंब कुठच्या कामाकरीता .

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो काम कधी करणार ?

**दिपक खांबित :-**

तुमची मंजूरी घेतल्यानंतर लगेच काम करणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तरी वेळ लागणार ना.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यावर ह्याचा अर्थ काय आहे ?

**दिपक खांबित :-**

मोठे असेल तर आयुक्तांच्या हातात असते. १० लाख रू. आत असेल तर आयुक्तांची मंजूरी होणार आणि त्याच्यावरती असेल तर तुमची मंजूरी होणार.

**मिलन म्हात्रे :-**

रस्ते दुरूस्ती कामावर विलंब, विलंब कशाकरीता होतो. मिटींग होत नाही का?

**दिपक खांबित :-**

साहेब विलंब कशाला होतो ते मी सांगतो आता आपली प्रोव्हिजन कशी आहे. कोणी आपल्या परमिशन मागितली. आपण पैसे घेवून त्याला परमिशन देतो. त्या नंतर त्याचा एस्टिमेंट करतो. प्रत्येक वेळेला टेंडर काढतो. मंजूर करतो मग कामाला सुरूवात करतो.

**मिलन म्हात्रे :-**

ती प्रोसिजरच आहे ना.

**मा. आयुक्त :-**

प्रोसिजर तर तीन महिन्याची आहे ना त्यामुळे खड्डे जे होतात.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, मी काय म्हणतो की, कार्यादेश मिळाल्यानंतर सुध्दा सहा-सहा महिने कामे झाले नाही. त्याचे बोला सगळी प्रोसिजर झाल्यानंतर.

**दिपक खांबित :-**

साहेब, कुठली?

**मा. आयुक्त :-**

या विषया वरचे बोला. आता परत पाठीमागचे उघडून काय उपयोग आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, असे नाही. इतिहास असतो. तुम्ही मागच्या वेळेला खर्च केला त्याचा पुढे काय झाले. कार्यादेश दिला गेला. त्या कार्यादेशाचे कागदाची काही किंमत नाही. साहेब वर्षी काही विषय पेंडीग आहे का ते बघा. नाहीतर ती परत ह्या कामात येतील.

**मा. आयुक्त :-**

साहेब नाही येणार कारण ते पाठीमागचे टेंडर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ते बघा कसे काय ते. कारण मला माहित नाही मला एवढं माहित आहे की, काम निघाल्यानंतर इकडे १० लाख रू. ची मंजूरी मिळाली की, अमाउंट नंतर वाढली तर त्याची वाढीव रक्कम येतच नाही.

**मदन सिंग :-**

इसमे जो दिया है । रिलायन्स एम.टी.एन.एल. महानगर यह सिर्फ दुसरो के लिए है । की, अपनी पाणी पुरवठा उनको खुदाई होती है उसके लिए भी है ।

**मा. आयुक्त :-**

सबका है

**मिलन म्हात्रे :-**

अपना पाणी पुरवठा

**मा. आयुक्त :-**

प्रायव्हेट लागोने वॉटर सप्लाय का कनेक्शन लिया है।

**मिलन म्हात्रे :-**

पब्लिक से पैसे लेते है ना ।

**दिपक खांबित :-**

उनको ऑर्डर देने का वह पिछे से करते जायेंगे

**याकुब कुरेशी :-**

आपल्याकडे पद्धत आहे की, एक खड्डे होत नाही. जो पर्यंत तो कॉन्ट्रक्टर माल घेवून येत नाही. तो पर्यंत रस्ते दुरूस्त करत नाही. अशी ही प्रथा आहे.

**मदन सिंग :-**

अभी मेरे वॉर्ड मे एक पाणी की पाईप लाईन बंद है ।

**याकुब कुरेशी :-**

परंतू, तुम्ही असे कॉट्रक्टर शोधा। समजा तिथे २० X २ चा खड्डा आहे. रोड क्रॉसिंग आहे. आणि पाईप लाईन साठी खड्डा केलेला आहे आणि बुजवून ठेवलेला आहे. तो आता फुलगाडीचा लोड होईल. तेव्हा तो लोड घेवून येईल आणि रस्ता दुरूस्त करेन. पण असे न करता की, जेवढा खड्डा झाला आहे तो आताच्या आता दुरूस्त करून द्या. अशी काय योजना करा.

**मिलन म्हात्रे :-**

ती कामे तुम्ही एका वेळेला चार कामे काढलीत तर तो लोढ डिवायड होता ना. साहेब आमच्याकडे खर्चाला मंजूरी द्यायला आमची कसलीच हरकत नाही. नागरीक रस्त्यावर उभा राहून आम्हाला विचारतात मी तुम्हाला आता लोकेशन देतो. आपण सुभाषचंद्र बोस मैदानावरून निघालो. किंवा इकडून स्मशान भूमीला जातो, साहेब दिड वर्ष झाले खड्डे जसे आहेत तसे आहेत आतून आहोत गाड्या रोज आपटतात आता आपल्याकडे प्रतिभाताई पाटील आल्या होत्या.

**मा. आयुक्त :-**

यासाठी आपल्याकडे टेन्डर आलेले आहे. ते मंजूर करायच की नाही करायचं.

**मिलन म्हात्रे :-**

आमचा विरोध आहे, साहेब

**मदन उदितनारायण सिंहः-**

मा. आयुक्त साहेब हे आपल्याला करायचं आहे. पण आपल्याकडे छोटे मोठे खड्डे होतात त्याचवर पण आपल्याला लक्ष द्यायचे आहे.

**शानु गोहिल :-**

मा. आयुक्त साहेब मै इसमें एक सुचना देता हूँ, हमारे यहा एक पाईप लाईन लिक हो गयी थी वो ऐसेही छे महिने ऐसे पडी है. वो तो छोड दिजिये अभी अपने शहर मै एक महिना भी नही हुआ होगा राष्ट्रपती महोदया आयी थी राष्ट्रपती महोदया आयी उनके लिए सबकुछ तयारी हुई लेकिन ये जो फ्लाय ओव्हर से निचे उतरते है, बांगलादेश झोपड पट्टी है उधर कोने में बिचमे बढे खड्डे पढे है । छोटी छोटी बातोपर ध्यान देना चाहिए ।

**जुबेर इनामदार :-**

खांबित साहेब आपली चर्चा तुमच्या केबिन मध्ये झाली होती. आपण पॅचप दुरूस्तीची कामे करतो मुंबईमध्ये एक मशीन येते. चार पाच इंच ते डिग करते परत कंप्लीट ॲज अ निअर आणि त्याच्यावर एक बिम वैगेरे लागू करतो.

**दिपक खांबित :-**

जुने रस्ते जे असतात ना...

**जुबेर इनामदार :-**

ते लोक रिसरफेस करतात. साहेब, आपणाकडे एक खड्डा वाढला तर त्यालाच फक्त बुजवतात त्याचा काही अर्थ राहत नाही. कारण तो केल्यावर रस्ता व्यवस्थित दिसतही नाही. चांगल्या यंत्रणा घेवुन या. व्यवस्थित कामे झाले पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण आता जे नविन मंजुर करु ना त्यावेळी पुर्नःपृष्ठीकरण......

**मिलन म्हात्रे :-**

मा. सभापती साहेब आता त्या त्या विभागातले जे.इ. आहेत ना. त्यांच्यावर पण जिम्मेदारी दिली पाहिजे. की हे खड्डे आहेत किती ते कधी बुजणार? तुमच्याकडे ते काम केले पाहिजे. नगरसेवकांनीच पत्र द्यायची का? आता आमच्याकडे दिड वर्ष झाली गटाराची झाकणे अशी खोलेलेली आहे.तिथे लहान मुल पडतात जे.ई. चे काम नाही. त्याच्यामध्ये त्या जे.ई. ने रिपोर्ट दिला पाहिजे. जे.ई. ला जबाबदार पण पकडा.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही त्या मधुन नगरसेवक निवडुन येता चेंबर गेल्यानंतर आम्ही तुमच्यासमोर चेंबर बसवु देतो.

**मिलन म्हात्रे :-**

दिड-दिड वर्ष झाले आम्ही पत्रव्यवहार केलेला आहे. अजुन आमची कामे झाली नाही. म्हणुन जिम्मेदारी फिक्स करा.

**दिपक खांबित :-**

सन्मा. सदस्य म्हात्रे साहेब जे बोलतात ना ते काम सुरु होईल.

**मा. आयुक्त :-**

चेंबर जे आहे ते स्टिलचे आहे की फायबरचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्याकडे सिमेंटचे टाकतात. फुटपाथवर सिमेंटचे चालते.

**मा. आयुक्त :-**

भंगारवाले ते सैल करतात आणि काढतात.

**मिलन म्हात्रे :-**

ते झाकण बंद तरी करा.

**शानु गोहिल :-**

मा. आयुक्त साहेब, मा. महासभा मिटिंग मे खांबित साहब ने ऐसा खुलासा किया था की फायबर के ढक्कन बहोत महेंगे पडते है।

**मा. आयुक्त :-**

लेकिन उसमे जो सिमेंट मे स्टिल आता है। वह स्टिल निकालने के लिए चेंबर लेते है।

**शानु गोहिल :-**

इसलिए वहा चोरी होती है। तो यह फायबर भी तो महंगा पड रहा था।

**मा. आयुक्त :-**

महेंगा पडा लेकिन वह लेके नही जानेवाले ना

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, तुम्ही कॉस्टिंग करा. आपल्याला जे चांगले रिझनेबल पडेल ते बसवुन द्या. आम्हाला ते झाकण बंद करायची मतलब आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, कमीत कमी अडीच-अडीच, तीन-तीन इंचाचे फायबर थिकनेस येतात आणि ते चांगले आहे. ते चोरी होत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही तो निर्णय घ्या. झाकण पण फुटतात. चांगल झाले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

करु ना.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्ते दुरूस्ती कामात होणाऱ्या दिरंगाई बाबत अर्थसकल्पावेळी मा. स्थायी समिती सभेत सखोल चर्चा करण्यात आली. मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दित सुमारे १७३.४० कि.मी. लांबीचे डांबरी व १५९.२० कि.मी. लांबीचे सिमेंट क्रॉंक्रीट पायवाटा आहेत. शहरातील महानगरपालिकेच्या रस्त्यावरून रिलायन्स एनर्जी, एम.टी.एन.एल, टाटा पॉवर कंपनी, रिलायन्स इन्फोमॅजिक, एअर टेल, महानगर गॅस लिमिटेड इ. च्या केबल्स टाकण्यात आलेल्या आहेत. तसेच महानगरपालिकेच्या सर्व जलवाहीन्या देखिल रस्त्यावरूनच टाकण्यात आलेल्या आहेत. सदर सर्व एजन्सीमार्फत सार्वजनिक प्रयोजनकरीता नविन, केबल्स टाकणे, वाढीव केबल्स लाईन टाकणे, फॉल्ट काढणे, दुरुस्ती करणे करीता वारंवार खोदण्यात येतात. सदर एजन्सीमार्फत रस्ते खोदाई करीता परवानगी घेताना सदर रस्ता दुरुस्ती करीता लागणारी रक्कम महानगरपालिकेकडे भरण्यात येते. तद्नंतर रस्ते खोदाई करण्यास परवानगी देण्यात येते. महानगरपालिकेकडून अशाप्रकारे खोदण्यात आलेल्या रस्त्याच्या दुरुस्ती करीता अंदाजपत्रक तयार करुन समक्ष मान्यतेने निविदा मागविण्यात येतात. तद्नंतर निविदा मंजूर झाल्यावर ठेकेदारास कार्यादेश देउुन काम करुन घेण्यात येतात. तथापि रस्ता खोदाई केल्यावर रस्ता पूर्ववत दुरुस्ती होईपर्यंत बराच कालावधी लागतो, रस्ते तातडीने दुरुस्ती न झाल्याने नागरीक, लोकप्रतिनिधीमार्फत नाराजी व्यक्त करण्यात येते.

रस्ते दुरुस्ती कामांवर होणारा विलंब टाळण्याकरीता ठेकेदाराचे दर निश्चित करुन खोदाई परवानगी बरोबरच ठेकेदारास सदर रस्ता पूर्ववत करण्याकरीता कार्यादेश दिल्यास खोदाई काम पूर्ण होताच त्वरीत रस्ते दुरुस्ती करता येतील. मा. महासभा दि.२१/२/२००९ मध्ये याबाबत चर्चा होऊन मंजूर अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार रस्ते दुरुस्ती करीता वार्षिक दराच्या निविदा मागविण्यात मंजूरी दिलेली आहे. तरी सन २००९-२०१० या वर्षात रस्ते दुरुस्ती करीता विभागवार ठेकेदार नेमण्याकरीता वार्षिक दराच्या आयटम रेटच्या निविदा मागविण्यात मंजूरी देण्यात येत आहे. रस्ते दुरुस्ती करीता खोदाई परवानगी दिल्यावर त्वरीत अंदाजपत्रक तयार करुन संबंधित ठेकेदारास रस्ते दुरुस्तीचे कार्यादेश दयावेत व खर्चास वेळोवेळी मा. आयुक्त व मा. स्थायी समितीची मान्यता घेण्यात यावी. सार्वजनिक संस्था मार्फत खोदण्यात येणारे रस्ते, पाणीपुरवठा विभागामार्फत खोदण्यात येणारे रस्ते व पावसाळयात पडणारे खड्डे इत्यादी दुरुस्ती करीता स्वतंत्र नोंदी ठेवण्यात याव्यात संबधितानी विनापरवानगी रस्ते खोदल्यास दुप्पट दराने खोदाई चार्जेस वसूल करण्यात

यावेत. फायबर ऑप्टीकल केबल करीता खोदाई परवानगी देताना शासकीय दराने शुल्क आकारण्यात यावे. तसेच गटारावरील झाकणे चोरीला जात असल्याने गटारावर फायबर कॉक्रीट झाकणे बसविण्याकरीता देखिल वार्षिक दर मागवून ठेका निश्चित करण्याकरीता निविदा मागविण्यात याव्यात. रस्ते खोदाई करीता मोठया प्रमाणावर परवानगी देताना संबधित विभागातील नगरसेवकांना माहीती देण्यात यावी.

**शानु गोहिल :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब माझी एक सुचना आहे. ज्यावेळी परमिशन देतात. त्यावेळी एरियाच्या प्रतिनिधी यांना कोणाला काहीही माहित नसते की, कुठचे खोदकाम चालते. त्यास परमिशन आहे की नाही. साहेब एरिया मध्ये परमिशन दिलेले आहे. त्याची माहिती लोकप्रतिनिधीना द्यावी. साहेब कसे झाले की, आमच्या एरियामध्ये ८ नंबर मध्ये आणि ९ नंबर मध्ये एमटीएनएल ने पुर्ण रोड खोदुन टाकलेला आहे. कोणाला काहीच माहित नाही. खांबित साहेब त्याची परमिशन घ्ोतली का? नयानगर टेलीफोन निगम ने आणि तिथे सेक्टर ३ ला ते लोक खोदायला गेले होते. तेव्हा लोक सगळी जमा झाली. त्यांनी विचारले कोणाची परवानगी घेतली. ते बोलले वैती साहेबांनी सांगितले. परमिशन देतेवेळी लोक प्रतिनिधींना माहिती द्यावी.

**मा. आयुक्त :-**

ज्या एरियामध्ये खोदाई होणार आहे. त्या एरियामध्ये त्या नगरसेवकाला कळविले जाईल.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, याच्यामध्ये एका गोष्टीचा उल्लेख नाही. बरेचसे समारंभ रोडवर होतात. होर्डिंग्ज लागतात. गेटवर बोर्ड लागतात त्यावेळी प्रभाग समिती कार्यालयामार्फत परमिशन देण्यांत येते त्यावेळी सुद्धा सेंटरने रोड खोदतात. परमिशन देतेवेळी कॉम्पनसेशन घेत नाही.

**मा. आयुक्त :-**

आपण पैसे घेतो ना. मंडपाचे

**अनिल सावंत :-**

तुम्ही मंडपाचे परवानगीचे पैसे घेतात.

**मा. आयुक्त :-**

खोदायचे पण पैसे घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, माझे तर असे म्हणणे आहे की, ज्या कमानी लावल्या जातात ना. त्या रस्त्यामध्ये लावल्याच नाही पाहिजेत.

**मा. आयुक्त :-**

तुमच्या आयटम वाइस शब्द वापरा.

**मा. सभापती :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. :- १३६**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते दुरुस्ती करणे बाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. १२४ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्ते दुरूस्ती कामात होणा-या दिरंगाई बाबत अर्थसकल्पावेळी मा. स्थायी समिती सभेत सखोल चर्चा करण्यात आली. मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दित सुमारे १७३.४० कि.मी. लांबीचे डांबरी व १५९.२० कि.मी. लांबीचे सिमेंट क्रॉंक्रीट पायवाटा आहेत. शहरातील महानगरपालिकेच्या रस्त्यावरून रिलायन्स एनर्जी, एम.टी.एन.एल, टाटा पॉवर कंपनी, रिलायन्स इन्फोमॅजिक, एअर टेल, महानगर गॅस लिमिटेड इ. च्या केबल्स टाकण्यात आलेल्या आहेत. तसेच महानगरपालिकेच्या सर्व जलवाहीन्या देखिल रस्त्यावरूनच टाकण्यात आलेल्या आहेत. सदर सर्व एजन्सीमार्फत सार्वजनिक प्रयोजनकरीता नविन, केबल्स टाकणे, वाढीव केबल्स लाईन टाकणे, फॉल्ट काढणे, दुरुस्ती करणे करीता वारंवार खोदण्यात येतात. सदर एजन्सीमार्फत रस्ते खोदाई करीता परवानगी घेताना सदर रस्ता दुरुस्ती करीता लागणारी रक्कम महानगरपालिकेकडे भरण्यात येते. तद्नंतर रस्ते खोदाई करण्यास परवानगी देण्यात येते. महानगरपालिकेकडून अशाप्रकारे खोदण्यात आलेल्या रस्त्याच्या दुरुस्ती करीता अंदाजपत्रक तयार करुन समक्ष मान्यतेने निविदा मागविण्यात येतात. तद्नंतर निविदा मंजूर झाल्यावर ठेकेदारास कार्यादेश देवुन काम करुन घेण्यात येतात. तथापि रस्ता खोदाई केल्यावर रस्ता पूर्ववत दुरुस्ती होईपर्यंत बराच कालावधी लागतो, रस्ते तातडीने दुरुस्ती न झाल्याने नागरीक, लोकप्रतिनिधीमार्फत नाराजी व्यक्त करण्यात येते.

रस्ते दुरुस्ती कामांवर होणारा विलंब टाळण्याकरीता ठेकेदाराचे दर निश्चित करुन खोदाई परवानगी बरोबरच ठेकेदारास सदर रस्ता पूर्ववत करण्याकरीता कार्यादेश दिल्यास खोदाई काम पूर्ण होताच त्वरीत रस्ते दुरुस्ती करता येतील. मा. महासभा दि.२१/२/२००९ मध्ये याबाबत चर्चा होऊन मंजूर अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार रस्ते दुरुस्ती करीता वार्षिक दराच्या निविदा मागविण्यात मंजूरी दिलेली आहे. तरी सन २००९-

२०१० या वर्षात रस्ते दुरुस्ती करीता विभागवार ठेकेदार नेमण्याकरीता वार्षिक दराच्या आयटम रेटच्या निविदा मागविण्यात मंजूरी देण्यात येत आहे. रस्ते दुरुस्ती करीता खोदाई परवानगी दिल्यावर त्वरीत अंदाजपत्रक तयार करुन संबंधित ठेकेदारास रस्ते दुरुस्तीचे कार्यादेश दयावेत व खर्चास वेळोवेळी मा. आयुक्त व मा. स्थायी समितीची मान्यता घेण्यात यावी. सार्वजनिक संस्था मार्फत खोदण्यात येणारे रस्ते, पाणीपुरवठा विभागामार्फत खोदण्यात येणारे रस्ते व पावसाळयात पडणारे खड्डे इत्यादी दुरुस्ती करीता स्वतंत्र नोंदी ठेवण्यात याव्यात संबधितानी विनापरवानगी रस्ते खोदल्यास दुप्पट दराने खोदाई चार्जेस वसूल करण्यात यावेत. फायबर ऑप्टीकल केबल करीता खोदाई परवानगी देताना शासकीय दराने शुल्क आकारण्यात यावे. तसेच गटारावरील झाकणे चोरीला जात असल्याने गटारावर फायबर कॉक्रीट झाकणे बसविण्याकरीता देखिल वार्षिक दर मागवून ठेका निश्चित करण्याकरीता निविदा मागविण्यात याव्यात. रस्ते खोदाई करीता मोठया प्रमाणावर परवानगी देताना संबधित विभागातील नगरसेवकांना माहीती देण्यात यावी.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३७, पाणी पुरवठा विभागातील कामांना आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

महानगरपालिका क्षेत्रात दाचकूलपाडा, लक्ष्मीबाग येथे पाण्याची अत्यंत गैरसोय आहे. सदर परिसरात अद्याप जलावाहिनी अंथरण्यात आलेली नाही. परिणामी सदर भागास पाणी पुरवठा अद्याप होउ शकलेला नाही. याकरीता दाचकूलपाडा, लक्ष्मीबाग येथे बिडाची जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे. जेणेकरून वरील परिसराची पाणी समस्या दुर होउ शकेल. सदर कामाचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्यासाठी रू.१२,६४,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरच्या कामाच्या खर्चाची तरतूद सन २००८-०९ च्या वार्षिक अर्थसंकल्पात **"नविन जलवाहिनी टाकणे" (रू.५००.०० लक्ष)** या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात आलेली आहे. उपरोक्त कामाच्या प्रस्तावाची रक्कम पाईप व मजूरी दर एकत्रित करून आहे. तथापी यापुर्वी अशा प्रकारच्या कामाकरीता मागविलेल्या निविदांबाबतचा अनुभव पाहता उपरोक्त कामाकरीता व जलवाहिनी अंथरणेच्या इतर कामांकरीता लागणारे पाईप स्वतंत्ररित्या पाणी पुरवठा विभागामार्फत निविदा मागवून खरेदी करणेस तसेच जलवाहिनी अंथरण्याची कामे स्वतंत्ररित्या निविदा मागवून करून घेणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती साहेब, ह्याच्यामध्ये सन २००८-०९ साली ५ करोड रु. चे प्रोव्हिजन आहे. त्यातले आजपर्यंतच किती शिल्लक आहेत? खर्च किती झाले?

**शिवाजी बारकुंड :-**

सव्वा कोटी रु. खर्च झाले.

**अनिल सावंत :-**

फक्त

**शिवाजी बारकुंड :-**

हो.

**अनिल सावंत :-**

मग, तुमच्याकडे बाकीची कुठची प्रकरण प्रलंबित आहे का?

**शिवाजी बारकुंड :-**

मागील चार-पाच वेळा टेंडर पण काढलेले आहे. पंरतु, पाईपच्या दरामध्ये आणि याच्यामध्ये तफावत असल्यामुळे टेंडर कोणी भरलेले नाही. आता ठराव असा झालेला आहे. त्याप्रमाणे ते स्वतंत्र पाईपचे रेट मागवणार आणि मंजुरी काम वेगळे काढणार. त्याप्रमाणे.....

**अनिल सावंत :-**

आता जो ठराव झालेला आहे तो तुमच्या लक्ष्मी पार्क आणि राजकुल पाडा साठीच झालेले आहे ना.

**शिवाजी बारकुंड :-**

ह्याच्या अगोदर मान्यता झालेली आहे. मागील वर्षात आपण पाईप लाईनचे काम केलेले आहे. आता.....

**अनिल सावंत :-**

मग तुम्ही ही नविन जलवाहिनी टाकता का? त्याच्या अगोदर जलवाहिनी नव्हती.

**शिवाजी बारकुंड :-**

डचकुल पाड्याला जायचा रस्तासुद्ध नव्हता.

**मिलन म्हात्रे :-**

पण ह्याच्यामध्ये फक्त अमाउन्ट दिले. लांबी काहीच दिली नाही. आता हे १२ लाख रु. काढले कशावरुन?

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे साहेबांना एस्टीमेटची कॉपी द्या.

**मिलन म्हात्रे :-**

पण एस्टीमेट नुसार काम झाले पाहिजे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १३७ -**

पाणी पुरवठा विभागातील कामांना आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणे.

**ठराव क्र. १२५ :-**

महानगरपालिका क्षेत्रात दाचकूलपाडा, लक्ष्मीबाग येथे पाण्याची अत्यंत गैरसोय आहे. सदर परिसरात अद्याप जलावाहिनी अंथरण्यात आलेली नाही. परिणामी सदर भागास पाणी पुरवठा अद्याप होउ शकलेला नाही. याकरीता दाचकूलपाडा, लक्ष्मीबाग येथे बिडाची जलवाहिनी अंथरणे आवश्यक आहे. जेणेकरून वरील परिसराची पाणी समस्या दुर होउ शकेल. सदर कामाचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून त्यासाठी रू.१२,६४,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरच्या कामाच्या खर्चाची तरतूद सन २००८-०९ च्या वार्षिक अर्थसंकल्पात **"नविन जलवाहिनी टाकणे" (रू.५००.०० लक्ष)** या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात आलेली आहे. उपरोक्त कामाच्या प्रस्तावाची रक्कम पाईप व मजूरी दर एकत्रित करून आहे. तथापी यापुर्वी अशा प्रकारच्या कामाकरीता मागविलेल्या निविदांबाबतचा अनुभव पाहता उपरोक्त कामाकरीता व जलवाहिनी अंथरणेच्या इतर कामांकरीता लागणारे पाईप स्वतंत्ररित्या पाणी पुरवठा विभागामार्फत निविदा मागवून खरेदी करणेस तसेच जलवाहिनी अंथरण्याची कामे स्वतंत्ररित्या निविदा मागवून करून घेणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३८, प्रभाग कार्यालय व विभागीय कार्यालय ऑप्टीकल फायबर केबलने जोडणेबाबत निविदेस मंजुरी देणे.

**मा. आयुक्त :-**

प्रकरण क्र. १३८, १३९ हे दोन्ही विषय तहकुब करायचे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, कशासाठी?

**मा. आयुक्त :-**

कारण मला ते पटलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुमच्याप्रमाणे करुन घ्या. माझी अशी विनंती आहे. पुढे विषय आणाल ना. मा. आयुक्ताचे अवलोकन आहे. मगाशी वाद झाला. तो ह्याच्यावरच झाला. मला एक सांगा संगणक प्रिंटर, सर्व्हेर, साहित्य, वार्षिक देखभाल दुरुस्ती करणेबाबत. आपल्याकडे तुमचे जे प्रिंटर आहे. त्यातले किती प्रिंटर चालु आहे ते बघा. आपल्या सी.एफ.सी. ला कधी एक प्रिंटर चालु असतो. कधी नसतो कधी देत नाही. त्यासाईडचे कॉम्प्युटर बंद असतात. तिकडची लोक इकडे पैसे भरायला येतात. मग या मॅडम नाही सांगतात. ह्याची जरा पुर्ण चौकशी करा.

**मा. आयुक्त :-**

दोन प्रिंटर पैकी एक बंद आहे तो दुरुस्त करुन घेवू.

**मा. आयुक्त :-**

साहेब मला सांगा तुम्ही कराल ना. हा परतच करतो ना. लिस्ट काढुन घ्या. आणि एकदाच कायम करुन घ्या.

**जुबेर इनामदार :-**

हा विषय आला होता तेव्हा त्यांच्याकडे एक कंपनी सुद्धा पाठवुन दिली होंती. कार्टेजेस वगैरे आहे. ते कोणी विकत घेतो.

**मिलन म्हात्रे :-**

नवनि कार्टेज कशाला घेता? साहेब रु. २५० मध्ये कार्टेज आम्ही आणतो.

**जुबेर इनामदार :-**

ते लोक कार्टेज रिफिल करुन देतात. तर त्यांना मी कंबाईनचे पाठवुन दिलेले आहे. त्याच्यावरसुद्धा कारवाई झाली पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

कॉम्प्युटरचे सगळे मटेरियल काय दराने खरेदी करावे. गर्व्हमेन्टनी जी.आर. केलेला आहे. त्या रकमेच्यावर जाता येणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब आपल्यकडे कशी प्रथा आहे. प्रिंटरने कार्टेजेस संपले तर रु. ८५० चा कार्टेज येतो तर ते फेकुन देतात. दुसरा लावतात. साहेब, तोच कार्टेज रु. २२५ मध्ये कंपनी रिफिल करुन देते.

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र. १३८, १३९ हे दोन्ही तहकुब करण्यात येते.

(प्रकरण क्र. १३८ व १३९ हे दोन्ही विषय मा. सभापती यांच्या आदेशाने तहकुब करण्यात आले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४०, मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग) दुर्गंधीनाशके, खराटे, फुलझाडू व कचरा डब्बे खरेदी करणे. प्रकरण क्र. १४१, मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग) पितळी स्प्रे पंप, फॉग मशीन, सिंटेक्स टाक्या खरेदी करणे. प्रकरण क्र. १४२, मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग) डासनाशके, अळीनाशके तसेच धुकीकरण करणेकामी लागणारी औषधे खरेदी करणे. प्रकरण क्र. १४३, मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग) किटकनाशक / उंदीरनाशक खरेदी करणे. प्रकरण क्र. १४४, मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल बनविणे. प्रकरण क्र. १४५, मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग), व प्रकरण क्र. १४६, मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (नगरसचिव विभाग) नगरसचिव विभागाकरीता झेरॉक्स मशीन खरेदी करणे.

**अनिल सावंत :-**

प्रकरण क्र. १४१ च्या बद्दल आपण साहेब पितळी, स्प्रे पंपं मागवले होते. अपेक्षा हि होती की, प्रत्येक वॉर्डमध्ये एक-एक पंप असावा. त्यानंतर १५ दिवसात त्यातले जवळ-जवळ पितळी पंप ३० टक्के वर्किंगमध्ये होते. म्हणजे मिरारोडला आपले १९ वॉर्ड आहेत. १९ वॉर्ड मधले ७ पितळी पंप दुरुस्त होते आणि ते चालवत्यावेळी सुद्धा आपल्या कर्मचा-यांची एवढी हालत झाली होती.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, पितळी पंपाची काय गरज आहे? प्लास्टिकचे पंप उपलब्ध असतात. आणि ते ठराव झालेले कुठे आहेत?

**अनिल सावंत :-**

आणि ते पंप विकत घेतल्यानंतर त्या कॉंट्रॅक्टरकडुन त्याला मेंटेन्नन्सवर दिले नव्हते. असेच पडुन होते. आता मला तुम्ही माहिती द्या. पितळी पंपमधले किती पंप सध्या चालु आहे.

**अजित पाटील :-**

स्प्रे आणि पंप फॉगमशिनमध्ये फरक आहे.

**अनिल सावंत :-**

मी तुम्हाला स्प्रें पंपाबद्दल बोलतो. नंतर फॉगमशिनबद्दल बोलतो.

**अजित पाटील :-**

स्प्रे पंप मुर्धा राई मध्ये दोन पंप बंद आहेत. नंतर मिरारोडचा एक स्प्रे पंप बंद आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आमच्याकडे पण बंद आहे. माझ्याकडे ७ पंप चोरीला गेले. अजुन एफआयआर लॉज झालेला नाही.

**अनिल सावंत :-**

पितळी पंप स्प्रे पंप तुम्ही म्हणता मिरारोडला एकच बंद आहे. म्हणजे १८ पंप असायला पाहिजे. १९ वॉर्ड आहेत. कुठच्या कुठच्या वॉर्डमध्ये आहे ते जरा सांगा.

**अजित पाटील :-**

१९ वॉर्ड मध्ये १ पंप बंद दाखवतात.

**अनिल सावंत :-**

म्हणजे १८ पंप असायला पाहिजे ना तर कुठच्या कुठच्या वॉर्डमध्ये आहे ते सांगा. माझ्या वॉर्डमध्ये वैती साहेबांच्या वॉर्डमध्ये ही नाही.

**अजित पाटील :-**

आहेत. सगळ्या ठिकाणी आहे.

**अनिल सावंत :-**

आता वॉर्डची साइज केवढी झाली आहे.

**अजित पाटील :-**

मिरारोड वॉर्ड १९ आहेत.

**अनिल सावंत :-**

१९ आहेत. पण त्यामध्ये १८ पंप वर्किंग असायला पाहिजे ना.

**अजित पाटील :-**

आहेत ना. प्रत्येक वॉर्ड मध्ये आहे.

**मा. आयुक्त :-**

१८ पंप तिथल्या सॅनेटरी इन्स्पेक्टरनी त्यांना दाखवावे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, मला पंपावर सुचना करायची आहे. पितळाची पंप कशाला घेता आणि एवढ्या वर्षाची पितळची पंप घेतलेली आहे ती नादुरुस्त आहेत तर ती आहेत कुठे? रु. ३०० किलोने आजच्या तारखेला विकतात. त्यापेक्षा प्लास्टिकचे पंप घ्यावा.

**मिलन म्हात्रे :-**

प्लास्टिकचे चोरीला गेले. पितळेचा बरा आहेत तो टिकतो. पण तो मेन्टेन केला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

प्लास्टिकची टाकी आणि त्याला पितळची फिटींग देतात.

**अजित पाटील :-**

पण ते आमच्या कामातले कंपनीचे पंप आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

फायबरचे सगळे पंपं फेल गेले. आम्ही मागुन बघितले.

**मा. आयुक्त :-**

त्याचे पेमेन्ट केले का?

**अजित पाटील :-**

नाही केले.

**मा. आयुक्त :-**

ॲग्रीमेन्ट मध्ये काय आहे. ॲग्रीमेन्ट मध्ये वर्षाचे मेन्टेनन्स यायला पाहिजे नव्हते.

**मिलन म्हात्रे :-**

एक वर्षाच्या वॉरन्टीचा विषय टाकुन द्या.

**मा. आयुक्त :-**

ऑडीटर साहेब पेमेन्ट करण्यापुर्वी २ वर्षाचे त्याच्याकडून ना दुरस्त झाले तर स्वतःच्या खर्चाने दुरुस्त करुन द्यायचे. त्यासाठी करा. आणि मेन्टेनन्ससाठी त्याचेमधुन १० टक्के रक्कम कपात करुन ठेवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, १४२ प्रकरण क्र. बघा ना. लारवीसीड पेन्थीऑन इक्वालेन्ट मागवले ना. तर ते कुठल्या कंपनीतुन मागवते. आपल्या मा. महासभेत असे ठरलेले की, बेगॉन बायर इंडियाचे मागवले ना.

**अजित पाटील :-**

आपण बायर इंडिया कडुन मागवले ना. हे जूने आहे त्याच्याकडे.......

**ध्रुवकिशोर पाटील :-**

किती महिने झाले?

**अजित पाटील :-**

ऑगस्ट महिन्यात आहे.

**अनिल सावंत :-**

हे कुठच्या कंपनीचे आहे?

**अजित पाटील :-**

हे दुस-या कंपनीचे आहे.

**अनिल सावंत :-**

कशाला कारण त्याचा उपयोग झाला नाही ना?

**अजित पाटील :-**

हे औषध खरेदी केल्यानंतर चर्चा झाली. की बायर इंडियाचे .............

**अनिल सावंत :-**

आमच्यासमोर हे कशाला आणले?

**मा. आयुक्त :-**

टोटल किती सेप्टीक टँक आहे? त्याची लिस्ट आपल्याकडे आहे?

**अजित पाटील :-**

लीस्ट करावी लागेल.

**मा. आयुक्त :-**

का करावी लागेल गावामध्ये टोटल किती सेफ्टी टँक आहे. त्या सेप्टीटँकवर नायलॉनची जाळी बांधायची.

**जुबेर इनामदार :-**

अजित पाटील साहेब एम.एल.ओ उपलब्ध झाला का?

**मा. आयुक्त :-**

एम.एल.ओ १ लि. प्रत्येक टाकीमध्ये गेला पाहिजे आणि नायलॉनची जाळी त्याच्या तोंडावर बांधायला पाहिजे. तुम्ही प्रत्येक वर्षी डास मारण्यासाठी पैसे खर्च करत बसणार. प्रत्येक वेळा सेप्टीक टँकमधुन डास येणार. म्हणजे प्रत्येकवेळा आपण बाहेर आलेले मारणार. पण उत्पादन होवु नये यासाठी करायला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, गटार तुंबलेले आहे. त्याचे काय? तिकडे पण तेच करणार का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही आयुक्त आहेत ते सेनिटरी इन्स्पेक्टर आहात. त्यांना अक्कल नको ते शिकलेले आहेत ना. मग त्यांनी जाळी बांधली पाहिजे ना. त्यांनी अजुनपर्यंत जाळी का बांधली नाही.

**मा. आयुक्त :-**

डास अळी वाढली त्याचे मुळ ठिकाण आहे पाणी जिथे तुंबते तिथे. शेवटी टँक आणि गटरी....

**मिलन म्हात्रे :-**

तत्कालिन आयुक्तांनी दोन मिटिंग अगोदर त्यांना सगळ्या रुलिंग दिल्या होत्या. मागच्या वेळेचा सेफ्टी टँक आम्ही बुजवुन घेतो असा विषय झालेला आहे.

**मा. आयुक्त :-**

जिथे जिथे गटारामध्ये पाणी तुंबले त्याचे ठिकाण लोकेशन करु स्वच्छ होतात की नही तेही बघु आणि पाणी जिथे जिथे अडलेले आहे. तिथे तिथे पाणी काढायचे स्वच्छ करायचे. आणि त्यावरही औषध मारु. परंतु होणे महत्त्वाचे आहे. पाण्याच्या ठिकाणीच डास अळी येतात. तिथे उत्पादन वाढते. उत्पादन वाढण्यावर बंदी घालु. म्हणजे डास बाहेर येणार नाही. प्रत्येक वेळा आपण डास मारण्यासाठी औषधे खरेदी करायचे आणि डास मारत बसायचे. उत्पादनामध्ये कमी नाही.

**सुनिता पाटील :-**

तुम्ही जे आता सांगितलेले आहे ना. ते आम्ही स्वतः केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, माझी सुचना अशी होती की, आमच्या इकडे आम्ही तळापासुन संपुर्ण गटार साफ करुन ती रबडी बाहेर काढतो. १५-२० मेन्टेनन्स नसते. माझ्याकडे तर नाल्यात ब्रशनी साफ करतो. तुम्ही येवुन बघा. मी त्याचवेळेला त्यांना सांगितलेले होते तर कोणी ऐकलेले नाही. म्हणुन आपण आज या परिस्थितीत आहोत.

**मा. आयुक्त :-**

उद्या संध्याकाळी ऐवढे मुकादम असतील त्यांनी सेफ्टीक टँकची लिस्ट घेवुन माझ्याकडे यायचे. ते काम मुकाट्याने करायचे आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब, तुम्ही सेफ्टीक टँक बद्दलची सुचना केली ना. सेफ्टीक टँकची मिरा भाईंदर शहरामध्ये एवढी वाईट परिस्थिती आहे. दोन दोन, तीन तीन वर्ष ते सेफ्टीक टँक कोणी साफच करत नाही. ॲक्चुली सहा महिन्यामध्ये तो सेफ्टीक टँक साफ व्हायला पाहिजे. म्युनिसीपालटीने चार्जेस लावुन साफ करायला सांगितले.

बिल्डिंगवाले चार्जेस द्यायला सुद्धा तयार आहे. पण आपल्या आरोग्य खात्यामध्ये तशी तशी कुठचीही सोय नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मागच्या मिटिंगला मी सुचना केली की, त्या हाय पॉवरच्या जास्त क्षमतेच्या आणा. अजित पाटील साहेबांनी सांगितले की....

**अजित पाटील :-**

सांगितले होते.

**अनिल सावंत :-**

लवकर प्रपोजल घेवुन याना.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, आपल्याकडे वॅक्युमचे जे पंप आहेत. ते फक्त पाणी खेचते

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब, सेफ्टिक टँक साफ करायचा प्रप्रोजल कधी आणता.

**मा. आयुक्त :-**

पुढच्या मिटिंगला आणा. प्रस्ताव येणार.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त साहेब, प्रस्ताव देताना मशिन जी घेतली जाईल. ती फक्त पाणी खेचेल. ती मशिन आपल्या कामाची नाही. आतला जो मळ आहे तो त्याच्या बरोबर आला पाहिजे.

**प्रकरण क्र. १४० :-**

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग) दुर्गंधीनाशके, खराटे, फुलझाडू व कचरा डब्बे खरेदी करणे.

**ठराव क्र. १२८ :-**

मा. आयुक्त सो. यांच्या मंजुरीनुसार महानगरपालिकेच्या मुख्यकार्यालय, मंगल कार्यालय, विभागीय कार्यालय, आरोग्य केंद्र, प्रभाग समिती कार्यालये, शाळा, आदी महापालिकेची मालमत्ता साफसफाई करणेकामी आवश्यक लागणारी दुर्गंधीनाशके, खराटे, फुलझाडु, कचराडब्बे खरेदी कामी निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदातील दर खालीलप्रमाणे आहेत.

**१) दुर्गंधीनाशके खरेदी :-**

| क्र | दुर्गंधीनाशकाचे नाव | मे.साईसिध्दी डिस्ट्री. | मे.रोहिणी एन्टर | मे. गुरुकृपा एन्टर. | मे. शहा फ़ार्मा |
|---|---|---|---|---|---|
| १ | काळे फ़िनाईल | रु. ८१/- प्र.लि. | रु. ९०/- प्र.लि. | **रु. ७२/-प्र.लि.** | रु.८५/-प्र.लि. |
| २ | सफ़ेद फ़िनाईल | रु.८०/- प्र.लि. | रु.८९/- प्र.लि. | **रु. ७२/-प्र.लि.** | रु.८३/-प्र.लि. |
| ३ | नॅपथेलिन बॉल | रु. १९०/- प्र.लि. | रु. २१५/- | **रु. १८५/-प्र.कि.** | रु.२००/-प्र.लि. |
| ४ | ॲसीड (ग्रेड-१) | रु. ६९/- प्र.लि. | रु. ८०/- प्र.लि. | **रु. ६०/-प्र.लि.** | रु.७५/-प्र.लि. |
| ५ | ए.एफ़.एम लिक्व्हीड | रु. ३५२/- प्र.लि. | **रु.३१०/- प्र.लि.** | रु.३२०/-प्र.लि. | -- |
| ६ | जर्मिनल लिक्व्हीड | रु. ३००/- प्र.लि. | **रु.२९५/- प्र.लि.** | -- | रु.३०५/-प्र.लि. |
| ७ | लिक्व्हीड सोप | रु. ६०/- प्र.लि. | रु. ८५/- प्र.लि. | **रु. ५१/-प्र.लि.** | रु.८०/-प्र.लि. |

वरील प्रमाणे तुलनात्मक तक्ता पाहाता निविदाकारांनी सादर केलेल दर हे जादा असल्याने संबंधीत सर्व कमी दराच्या निविदा कारांना वाटाघाटीस बोलाविले असता सादर केलेले दर खालीलप्रमाणे

| क्र | दुर्गंधीनाशकाचे नाव | मे.रोहिणी एन्टर | मे. गुरुकृपा एन्टर. |
|---|---|---|---|
| १ | काळे फ़िनाईल | -- | **रु. ६१/-प्र.लि.** |
| २ | सफ़ेद फ़िनाईल | -- | **रु. ५३/-प्र.लि.** |
| ३ | नॅपथेलिन बॉल | -- | **रु. १४७/-प्र.कि.** |
| ४ | ॲसीड (ग्रेड-१) | -- | **रु. ३२/-प्र.लि.** |
| ५ | ए.एफ़.एम लिक्व्हीड | **रु.२८२/- प्र.लि.** | -- |
| ६ | जर्मिनल लिक्व्हीड | **रु.२९०/- प्र.लि.** | -- |
| ७ | लिक्व्हीड सोप | -- | **रू. ३८/- प्र.लि.** |

**२) कार्यालयीन सफाईसाठी लागणारे साहित्य वस्तु :-**

| क्र | साहित्य वस्तुचे नाव | मे. रोहिणी एन्टर | मे.गुडलक कं.कं. | मे. इकोनिर्वाणा | मे.साईसिध्दी डिस्ट्री. |
|---|---|---|---|---|---|
| १ | खराटे | रु.३०/- प्र.नग | **रु.२६/- प्र.नग** | रु.२८/- प्र.नग | रु.३९/- प्र.नग |
| २ | फुल झाडु | रु.३७/- प्रती नग | **रु.३२/- प्र.नग** | रु.४२/- प्र.नग | रु.४०/- प्र.नग |
| ३ | कार्यालयीन लिटरबीन (१२० व with wheel व झाकण सह | रु.४३५०/- १२० लि. | रु.४३००/- १२०लि. | **रु.४३५०/- १२०लि.** | रु.४५००/- १२० लि. |

| | |
|---|---|
| | H.D.P.E Material) |

वरील प्रमाणे तुलनात्मक तक्ता पाहाता निविदाकारांनी सादर केलेल दर हे जादा असल्याने संबंधीत सर्व कमी दराच्या निविदा कारांना वाटाघाटीस बोलाविले असता सादर केलेले दर खालीलप्रमाणे

| क्र | साहित्य वस्तुचे नाव | मे.गुडलक कं.कं. | मे. इकोनिर्वाणा |
|---|---|---|---|
| १ | खराटे | **खराटे रु.२४/- प्र.नग** | -- |
| २ | फुल झाडु | **रु.३०/- प्र.नग** | -- |
| ३ | कार्यालयीन लिटरबीन (१२० लिटर with wheel व झाकण सह H.D.P.E Material) | -- | **रु.४२३०/-** १२० लि. |

वरीलप्रमाणे वाटाघाटी नंतर आलेल्या दरामध्ये महानगरपालिकेच्या मुख्यकार्यालय, मंगल कार्यालय, विभागीय कार्यालये, आरोग्य केंद्र, प्रभाग समिती कार्यालये, शाळा, आदी महापाकलकेची मालमत्ता साफसफाई करणेकामी आवश्यक लागणारी दुर्गंधीनाशके, खराटे, फुलझाडु, कचराडब्बे खरेदी करून पुरवठा करणेकामी संबंधित निविदाकार यांना दि. १८/८/२००८ रोजी कामाचा कार्यादेश देण्यात आला. याकामी रू. ७,१६,३५०/- येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

मा. स्थायी समितीने वरील प्रस्तावाचे अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १४१ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग) पितळी स्प्रे पंप, फॉग मशीन, सिंटेक्स टाक्या खरेदी करणे.

**ठराव क्र. १२९ :-**

मा. आयुक्त सो. यांच्या मंजुरीनुसार महानगरपालिका क्षेत्रामध्ये औषध / धुर फवारणी व औषध साठा करणेकामी आवश्यक लागणारे साहित्यवस्तुं जसे पितळी स्प्रे पंप, फॉग मशीन, सिंटेक्स टाक्या आदी खरेदी कामी निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदा दर खालीलप्रमाणे आहेत.

**१) पितळी स्प्रे पंप, फॉग मशीन, २००० लिटर क्षमतेच्या सिंटेक्स टाक्या :-**

| क्र. | निविदाकाराचे नाव | पितळी स्प्रे पंम्प | फ़ॉग मशीन | सिंटेक्सटाक्या (२००० ली.) |
|---|---|---|---|---|
| १ | **मे.महाराष्ट्र स्मॉलस्केल इंड.प्रा.लि** | --- | **रु. १७,७००/- प्रति नग** | --- |
| २ | मे. डॉल्फ़ीन सेल्स कॉर्पोरेशन | रु. ७९९०/- प्रति नग | --- | --- |
| ३ | मे.रमेश ॲग्रो केमी कॉर्पोरेशन | रु. ६८९०/- प्रति नग | --- | --- |
| ४ | **मे.महावीर मेडिकल सप्लाय** | **रु ४६८८/- प्रति नग** | ---- | **रु.९३६०/-प्रति नग** |
| ५ | मे.स्पाईक पेस्टो केमी | रु.५,४००/- प्रति नग | Fogger XL प्र.नग रु. ६,४००/- S.S.Fog 150 AF प्र.नग रु. ५७,४००/- | --- |

वरील प्रमाणे आलेल्या दराप्रमाणे संबंधित निविदाकारास साहित्य वस्तु खरेदी करून पुरवठा करणेकामी संबंधित निविदाकार यांना दि. ११/९/२००८ व दि. २९/११/२००८ रोजी कामाचा कार्यादेश देण्यात आला. याकामी रू. ९,५६,९४०/- येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

मा.स्थायी समितीने वरील प्रस्तावाचे अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १४२ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग) डासनाशके, अळीनाशके तसेच धुकीकरण करणेकामी लागणारी औषधे खरेदी करणे.

**ठराव क्र. १३० :-**

मा. आयुक्त सो. यांच्या मंजुरीनुसार महानगरपालिका क्षेत्रात डासांचा प्रादुर्भाव रोखणे कामी फवारणीकरिता डासनाशके, अळीनाशके तसेच धुकीकरण करणे कामी लागणारी औषधे खरेदी कामी निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदा दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र | निविदाकाराचे नाव | FOR LARVICIDE FENTHION OR EQUIVALENT | FOR FOGGING DELTAMEHTRIN ULV 1.25% OR EQUIVALENT | FOR ADULTICIDE CYFLUTHRIN 050% OR EQUIVALENT |
|---|---|---|---|---|
| १. | **मे साई सिध्दी डिस्ट्रीब्युटर** | **रु. ५३४/- प्रति किलो** | **रु. ४८६/- प्रती लिटर** | **रु. ५२९/- प्रती लिटर** |
| २. | मे. श्रीराम ॲग्रो एजन्सी | रु. १,७९९.८०/- प्रती लिटर | रु. १,६२४/- प्रती लिटर | रु. १,९००/- प्रती लिटर |
| ३. | मे. स्पाईक पेस्टोकेम प्रा.लि | रु.१,३५०/- प्रती लिटर | रु. ८४०/- प्रती लिटर | --- |
| ४. | मे. नॅशनल पेस्ट कंट्रोल | रु. ७३६/- प्रती लिटर | रु,. ७२९/- प्रती लिटर | रु. ७३१/- प्रती लिटर |
| ५. | मे.डॉल्फ़ीन सेल्स कॉर्पोरेशन | रु.१,७७५/- फ़ेन्थिऑन प्रती लिटर रु. १०४३/- टेमेफ़ॉक्स ५० टक्के | रु. १,६२०/- प्रती लिटर रु.११७९/- प्रती लिटर | रु. १८२९/-प्रती लिटर सायलफ़ोथिन रु.१०७९/- प्रती लिटर डेल्टामेथ्रीन |

वरील प्रमाणे आलेल्या दराप्रमाणे संबंधित निविदाकारास डासनाशके, अळीनाशके तसेच धुकीकरण करणे कामी लागणारी औषधे खरेदी करून पुरवठा करणेकामी संबंधित निविदाकार यांना दि. १८/८/२००८ रोजी कामाचा कार्यादेश देण्यात आला. याकामी रू. ९,४१,८०० येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

मा. स्थायी समितीने वरील प्रस्तावाचे अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १४३ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग) किटकनाशक / उंदीरनाशक खरेदी करणे.

**ठराव क्र. १३१ :-**

मा. आयुक्त साो. यांच्या मंजुरीनुसार महानगरपालिका गटारावर/कच-यावर फवारणीकामी करणेकामी तसेच माश्यांचा/उंदरांचा प्रादुर्भाव रोखणेकरिता आवश्यक किटकनाशक/उंदिरनाशक खरेदी करणेकामी निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदा दर खालीलप्रमाणे आहेत.

| क्र. | किटकनाशक/उंदिरनाशक | मे. गुरुकृपा एन्टर. | मे.साईसिध्दी डिस्ट्री. | मे.नॅशनल पेस्ट कंट्रोल |
|---|---|---|---|---|
| १. | मॅलेथिऑन ५ टक्के डि.पी | रु. ६१/- प्रती किलो | **रु. ५२/- प्रती किलो** | रु. ५७/- प्रती किलो |
| २. | कार्बोलिक पावडर | रु. ६५/- प्रती किलो | **रु. ४८/- प्रती किलो** | रु. ५५/- प्रती किलो |
| ३. | झिंक फ़ॉस्पाईड | रु.४२९/-प्रती ५०० ग्रॅम | **रु.४१८/-प्रती ५०० ग्रॅम** | रु. ४३२/- प्रती ५०० ग्रॅम |

वरील प्रमाणे आलेल्या दराप्रमाणे संबंधित निविदाकारास किटकनाशक/उंदिरनाशक खरेदी करून पुरवठा करणेकामी संबंधित निविदाकार यांना दि. १८/८/२००८ रोजी कामाचा कार्यादेश देण्यात आला. याकामी रू. ५,९५,८४०/- येणा-या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

मा. स्थायी समितीने वरील प्रस्तावाचे अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १४४ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल बनविणे.

**ठराव क्र. १३२ :-**

मा. आयुक्त सो., यांच्या मंजुरीनुसार महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल बनविणे व प्रसिध्द करणे कामाच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदा दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेत सादर केलेले दर |
|---|---|---|
| **१** | **मे. एनव्हायरो ॲनलिस्ट ॲण्ड इंजिनिअर्स प्रा.लि.** | **रु. ९,८०,८५०/-** |
| २ | मे. महाबल एनव्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि. | रु. १०,८१,०९०/- |
| ३ | मे. आकांक्षा ॲनेलिस्ट रिसर्च लॅब | रु. १२,०९,२००/- |
| ४ | मे. रोहन एनव्हायरो असोसिएटेड | रु. ११,२८,५५०/- |

वरील प्रमाणे तुलनात्मक तक्ता पाहाता निविदाकारांनी सादर केलेले दर हे जादा असल्याने संबंधित कमी दराच्या निविदाकारांना वाटाघाटी बोलविले असता सादर केलेले दर खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेत सादर केलेले दर |
|---|---|---|
| **१** | **मे. एनव्हायरो ॲनलिस्ट ॲण्ड इंजिनिअर्स प्रा.लि.** | **रु. ८,२४,३५०/-** |

वरील प्रमाणे वाटाघाटी नंतर आलेल्या दरामध्ये महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल बनविणे व प्रसिध्द करणेकामी संबंधित निविदाकारास दि. ०१/०८/२००८ रोजी कामाचा कार्यादेश देण्यात आला. याकामी रु. ८,२४,३५०/- येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

मा. स्थायी समितीने वरील प्रस्तावाचे अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १४५ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १३३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या खालील कामांना मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित खर्च | ठेकेदाराचे नांव | मंजूर दर |
|---|---|---|---|---|
| १ | मिरारोड शांतिनगर से. ३ मधील सी. २५/२६/२७, अे – ४६ ते सी – २४ पर्यत गटार पुर्नबांधणी करणे, जैन मंदिर समोर गटारावर स्लॅब टाकणे व फुटपाथवर कर्बस्टोन व पेव्हर ब्लॉक बसविणे. (नगरसेवक निधी) | रू. ५,०४,८००/- | मे. राणावत कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| २ | मिरागांव येथिल यशवंत विहार ते कुत्तर बावडी पर्यत गटार बांधणे व स्लॅब टाकणे. (नगरसेवक निधी) | रू. ५,११,८००/- | मे. गणेश असोसिएट्स | ०.००५% कमी दराने |
| ३ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (प.) सुभाषचंद्र बोस मैदान येथिल पंम्परुम, स्टोअर रुम येथे विदयुत फिटींग करणे. | रू. ५०,०००/- | मे. आर.के. इलेक्ट्रीकल्स वर्क्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ४ | भाईंदर (प) मुर्धा येथे विठ्ठल कुटीर ते रवि मेडीकल पर्यत गटार दुरूस्ती करणे. | रू. ९,८७,८००/- | मे. सैनिक इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| ५ | भाईंदर (प) प्रभाग क्र. २ जय अंबे झोपडपट्टी क्र. १ व २ मधील सी.सी. रस्ते दुरूस्ती करणे. | रू. ६,५४,१८३/- | मे. श्रृती इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| ६ | भाईंदर (प) येथिल भगतसिंग गार्डन दुरूस्ती करणे व कलर काम करणे. | रू. १,८६,६८८/- | मे. राठोड असोसिएट्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ७ | मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीचे एनर्जी ऑडीट करणे. | रू. ४५,०००/- | मे. एर्नटींक कंन्स्टल्टींग प्रा.लि. | रू. ४५,०००/- |
| ८ | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १४ मधील साई पराग इनक्लेव्ह समोरील क्रॉस ड्रेन दुरूस्ती करणे. | रू. ४९,२५०/- | मे. कंचन कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| ९ | भाईंदर (पूर्व) उड्डाणपुलाखालील शिधावाटप कार्यालय येथे वॉटर कुलर | रू. ५०,०००/- | मे. हायलाईट्स कन्स्टल्टंट | रू. ४९५००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बसविणे. (नगरसेवक निधी) | | | |
| १० | भाईंदर (पूर्व) रेल्वे गर्डरवर सुरक्षेतेकरीता रेलिंग करणे. | रू. ७,३९,६५०/- | मे. राठोड असोसिएट्स | अंदाजपत्रकिय दराने |
| ११ | भाईंदर (पूर्व) शिधावाटप कार्यालयात संगणक पुरवठा करून बसविणे. (नगरसेवक निधी) | रू. ५०,०००/- | मे. हायलाईट्स कन्स्टल्टंट | रू. ४९०००/- |
| १२ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचा नेपाळ-काठमांडू येथे अभ्यास दौरा आयोजित करण्याकरीता प्रवासाची, वाहतुकीची, राहण्याची, जेवणाची व स्थळ पाहणीची सर्व व्यवस्था करणे | रू. ८,८२,२००/- | मे. पिरॅमिड ट्रॅव्हल्स | रू. ४०,१००/- प्रति माणसी |
| १३ | भाईंदर (पूर्व) सुखी संसार अपा. ते रघुविर दर्शन पर्यत रस्ता पुर्नपृष्ठीकरण करणे. | रू. ९,९९,६००/- | मे. गणेश डेव्हलपर्स | अंदाजपत्रकिय दराने |
| १४ | भाईंदर (पूर्व) प्रभाग प्रभाग क्र. ४ मधील पाण्याच्या टाकीस लागून असलेल्या जागेत वाचनालय बांधणे. (दोन नगरसेवक निधी) | रू. ९,४२,९५०/- | मे. आकाश कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| १५ | मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारतीच्या आवारातील उदयानात स्वातंत्र्य सैनिकांचे स्मारक उभारणे. | रू. ६,७०,०००/- | मे. श्री मयुरेश्वर इंटरप्रायजेस | रू. ६,७०,०००/- |
| १६ | भाईंदर (प) उत्तन वेलंकनी चर्च शिरे क्रॉस रस्त्यापासून अलमेडा यांच्या घरापर्यत जाणारा रस्ता तयार करणे. | रू. ७,२९,१२०/- | मे. ललित इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| १७ | भाईंदर (पूर्व) मेडतीया नगर पासून आरक्षण क्र. २१७ पर्यत रस्ता बी.बी.एम. ने तयार करणे. | रू. ३,७९,१८४/- | मे. राजेश्री इंटरप्रायजेस | अंदाजपत्रकिय दराने |
| १८ | भाईंदर (पूर्व) नवघर नविन तलावास लागून तारेचे कुंपन बांधणे. | रू. ३५,८००/- | मे. विराज कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकिय दराने |
| १९ | भाईंदर (पूर्व) जेसल पार्क चौपाटी आरक्षण क्र. १२२ गार्डन विकसित करणे. (आमदार निधी) | | | रू. ९,३५,४६२/- |

| | | | | मे.श्री मयुरेश्वर इंटरप्रायजेस |
|---|---|---|---|---|
| **S N** | **Description Item** | **Code No** | **Qty** | **Amount** |
| 1 | A To B | PG KD - 04 | 1 | 27500 |
| 2 | Circular Swing | PG KD – 06 | 1 | 35000 |
| 3 | Wave Slide 2.1 | PG SD - 41 | 1 | 70000 |
| 4 | Roller Slide 2.1 | PG SD - 51 | 1 | 84000 |
| 5 | Spiral Slide 2.1 | PG SD - 02 | 1 | 169000 |
| 6 | Deluxe Slide 2.1 | PG SD – 81 | 1 | 55000 |
| 7 | Animal MGR | PG MR – 02 | 1 | 48000 |
| 8 | Four Seater MGR | PG MR – 05 | 1 | 38000 |
| 9 | Turbo Tower | PG SL - 07 | 1 | 38000 |
| 10 | Sattlite Scrambler | PG SL – 08 | 1 | 53500 |
| 11 | Spiral Scrambler 2.1 m | PG SL - 12 | 1 | 21500 |
| 12 | Climbing Wall | PG SL – 14 | 1 | 10500 |
| 13 | Gilder | PG FT - 02 | 1 | 36500 |
| 14 | Loop Rung | PG FT - 05 | 1 | 29500 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 15 | Swining LooP Rung | PG FT - 06 | 1 | 31500 |
| 16 | Double Bar | PG FT – 11 | 1 | 14000 |
| 17 | Crystal Maze | PG CL – 01 | 1 | 46500 |
| 18 | Ice cream Bin | PG GD – 08 | 1 | 13000 |
| 19 | Bird Bin | PG G D - 11 | 1 | 13000 |
| 20 | Stadium Bin | PG GD – 14 | 1 | 10500 |
| 21 | Lal matti | As Per Instruction | Brass | 1500 |
| 22 | Lawn | As Per Instruction | SMT | 550 |
| 23 | CC Pathway | As Per Instruction | CMT | 3674.99 |
| 24 | Brick Work | As Per Instruction | CMT | 3095.64 |
| 25 | Kota Tiles | As Per Instruction | SMT | 704.08 |
| 26 | Sand Face Plaster | As Per Instruction | SMT | 251.30 |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. ३ येथे बालउदयानाकरीता लाल माती पुरवठा करून पसरविणे व खेळणी पुरवठा करणे. (नगरसेवक निधी) | रू. ५,१५,५००/- | मे. एम.एस.एस.आय.डी. सी. लि. |

| S N | Description Item | Code No | Qty | Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | A To B | PG KD – 04 | 01 | 26800 |
| 2 | Circular Swing | PG KD – 06 | 01 | 34500 |
| 3 | Wave Slide 2.1 | PG SD - 41 | 01 | 69000 |
| 4 | Roller Slide 2.1 | PG SD - 51 | 01 | 82000 |
| 5 | Spiral Slide 2.1 | PG SD - 02 | 01 | 168600 |
| 6 | Deluxe Slide 2.1 | PG SD – 81 | 01 | 52700 |
| 7 | Animal MGR | PG MR – 02 | 01 | 47000 |
| 8 | Four Seater MGR | PG MR – 05 | 01 | 35000 |
| 9 | Turbo Tower | PG SL - 07 | 01 | 35000 |
| 10 | Sattlite Scrambler | PG SL – 08 | 01 | 50000 |
| 11 | Spiral Scrambler 2.1 m | PG SL - 12 | 01 | 18500 |
| 12 | Climbing Wall | PG SL – 14 | 01 | 7900 |
| 13 | Gilder | PG FT - 02 | 01 | 35000 |
| 14 | Loop Rung | PG FT - 05 | 01 | 26400 |
| 15 | Swining LooP Rung | PG FT - 06 | 01 | 28700 |
| 16 | Double Bar | PG FT – 11 | 01 | 10500 |
| 17 | Mulit Activity PlaySystem | MAPS – 02 | 01 | 427000 |
| 18 | Mulit Activity PlaySystem | MAPS – 07 | 01 | 320000 |
| 19 | Mulit Activity PlaySystem | MAPS – 12 | 01 | 211000 |
| 20 | Mini Tube Slide | PG SD – 33 | 01 | 128400 |
| 21 | Crystal Maze | PG CL – 01 | 01 | 43500 |
| 22 | Ice cream Bin | PG GD – 08 | 01 | 11000 |
| 23 | Bird Bin | PG G D - 11 | 01 | 11000 |
| 24 | Stadium Bin | PG GD – 14 | 01 | 17500 |
| 25 | Lal matti | | | 1200 |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | भाईंदर (पूर्व) मुलांना खेळण्याकरीता मुव्हेबल खेळणी पुरवठा करणे. (नगरसेवक निधी) | रू. ४,००,०००/- | मे. एम.एस.एस.आय.डी. सी. लि. |

| S N | Description Item | Code No | Qty | Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | A To B | PG KD – 04 | 01 | 26800 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 2 | Circular Swing | PG KD – 06 | 01 | 34500 |
| 3 | Wave Slide 2.1 | PG SD - 41 | 01 | 69000 |
| 4 | Roller Slide 2.1 | PG SD - 51 | 01 | 82000 |
| 5 | Spiral Slide 2.1 | PG SD - 02 | 01 | 168600 |
| 6 | Deluxe Slide 2.1 | PG SD – 81 | 01 | 52700 |
| 7 | Animal MGR | PG MR – 02 | 01 | 47000 |
| 8 | Four Seater MGR | PG MR – 05 | 01 | 35000 |
| 9 | Turbo Tower | PG SL - 07 | 01 | 35000 |
| 10 | Sattlite Scrambler | PG SL – 08 | 01 | 50000 |
| 11 | Spiral Scrambler 2.1 m | PG SL - 12 | 01 | 18500 |
| 12 | Climbing Wall | PG SL – 14 | 01 | 7900 |
| 13 | Gilder | PG FT - 02 | 01 | 35000 |
| 14 | Loop Rung | PG FT - 05 | 01 | 26400 |
| 15 | Swining LooP Rung | PG FT - 06 | 01 | 28700 |
| 16 | Double Bar | PG FT – 11 | 01 | 10500 |
| 17 | Mulit Activity PlaySystem | MAPS – 02 | 01 | 427000 |
| 18 | Mulit Activity PlaySystem | MAPS – 07 | 01 | 320000 |
| 19 | Mulit Activity PlaySystem | MAPS – 12 | 01 | 211000 |
| 20 | Mini Tube Slide | PG SD – 33 | 01 | 128400 |
| 21 | Crystal Maze | PG CL – 01 | 01 | 43500 |
| 22 | Ice cream Bin | PG GD – 08 | 01 | 11000 |
| 23 | Bird Bin | PG G D - 11 | 01 | 11000 |
| 24 | Stadium Bin | PG GD – 14 | 01 | 17500 |
| 25 | Lal matti | | | 1200 |

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर (प.) शहीद भगत सिंग उदयान येथिल कारंजे दुरुस्ती करणे. | रू. ४९,९२०/- | **मे. न्यू फिल्ड** |

| Sr.No. | Particular | Qty | Rate / Unit | Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Crown Brass Nosal | 13 | 875 | 11375 |
| 2 | Mist Brass | 25 | 1140 | 28500 |
| 3 | Steel Pipe Both side Thread | 3 | 1450 | 4350 |
| 4 | S & E of full glass | 5 | 450 | 2250 |
| 5 | S & F Replaement of colour Galss | 5 | 375 | 1875 |
| 6 | S & F of light fitting | 2 | 1400 | 2800 |
| 7 | Fabrication of light etc. | 1 | 1000 | 1000 |
| 8 | Electrication work etc. | 1 | 1500 | 1500 |
| 9 | S & F one load Relay | 2 | 242 | 4850 |
| 10 | S & F Contractor | 1 | 4500 | 4500 |
| 11 | Replacement of Buld | 1 | 349 | 349 |
| 12 | S & F of holder, connector etc. | 9 | 250 | 22500 |
| Total | | | | 65599.00 |

वरील पैकी अ.क्र. १ ते २२ कामाकरीता ठेकेदारांनी सादर केलेल्या निविदा मधील सर्वात कमी दराच्या निविदा धारकाकडून काम करुन घेण्यास व निविदास मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार अवलोकन करून मान्यता देण्यात येत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १४६ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (नगरसचिव विभाग) नगरसचिव विभागाकरीता झेरॉक्स मशीन खरेदी करणे.

**ठराव क्र. १३४ :-**

महानगरपालिका सचिव कार्यालयासाठी नवीन तीन झेरॉक्स मशिन खरेदी करण्यात आलेले असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | रेट कॉन्ट्रॅक्ट पत्रकातील अनुक्रमांक | मशिनचा तपशिल | | मशिनची किंमत प्रती नग दर कॉन्ट्रॅक्ट दराप्रमाणे |
|---|---|---|---|---|
| १ | २० | Canon iR 3225 Digital Multifunction copier Machines | Minimum Copying /Printing speed NOS. (cpm) : 25/25, paper Size (Original/Image) : A3/A3, RAM(MB) : 128, Hard Disk: : With 20GB HDD Bye Pass: 50 sheets,: 25 to 400% | Rs. 1,70,579/- (Rs. ONE LAKHS Seventy Thousand Five Hundred Seventy-Nine only (4% VAT Extra) 1,70,579 + 6824/- = 1,77,403/- |
| २ | २३ | Canon iR 3245 Digital Multifunction copier Machines | Minimum Copying /Printing speed NOS. (cpm) : 45/45, paper Size (Original/Image) : A3/A3, RAM(MB) : 256, Hard Disk: : With 20GB HDD Bye Pass: 50 sheets,: 25 to 400% | Rs. 3,10,000/- (Rs. Three Lakhs Ten Thousand only (4% VAT Extra) (Total Rs. 6,20,000/-) + Vat Rs. 24,800/- = 6,44,800/- |

सदर कॉन्ट्रॅक्ट करारनाम्यातील 'A' Schedue मध्ये वरीलप्रमाणे दर दर्शविलेले आहेत. व शेड्युल्ड B,C व Annxture C नुसार इतर अटीशर्ती लागु आहेत. झेरॉक्स मशिनच्या दरपत्रकाबाबत केंद्र शासन व राज्य शासनाकडे कॉन्ट्रॅक्ट दर मंजुर झालेले आहेत. त्यानुसार सदर झेरॉक्स मशिन खरेदी करणेत आलेल्या आहेत. याकरीता एकूण रक्कम रुपये ८,२२,२०३/- (अक्षरी रुपये आठ लाख बावीस हजार दोनशे तीन मात्र) खर्च झालेला आहे. तरी सदर कामाचे मा. स्थायी समिती अवलोकन करीत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व अवलोकन मंजुर करण्यात येत आहे. तशीच सभा संपली असे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. १२.४५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**